आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, ६ जानेवारी २०२४



आधुनिक केसरी

आजच्या पत्रकारांनी समाजातील वास्तव्य बाहेर आणावे. गोरगरीब, दुर्बल, दलित, पीडित शोषित यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होता कामा नये. अज्ञानी व्यक्तींना कोणी गुलाम बनवू नये. भारतीय संविधानाने सर्वांना सारखे हक्क व अधिकार दिले आहेत, हे पत्रकार बांधवांनी नेहमी लक्षात घ्यावे. स्वातंत्र्यापूर्वी असणारी पत्रकारिता ही निर्भिडपणाने चालत होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक यांची पत्रकारिता वाखण्याजोगी होती. यांचा विचार आजच्या पत्रकारांनी निश्चितपणे करावा. त्यांनी नीती मूल्याचा समतोल राखला पाहिजे. वृत्तपत्रातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडीवर आणि राजकारणावर प्रकाश टाकला जातो तो योग्य आहे की नाही याची जरूर पडताळणी करून पहावी. कारण त्यांना लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणतात. म्हणून कसल्याही पद्धतीने त्याचे महत्त्व कमी होता कामा नये. त्यानिमित्ताने हा केलेला शब्द प्रपंच.

# ज्ञानप्रसाराचे आद्य प्रवर्तक आचार्य बाळशास्त्री जांभेकर

विचारांची दिशा देणारी पत्रकारिता आज थोडी सौम्य होत आहे, असे मला वाटते. पूर्वीच्या काळात समाजात जागृती निर्माण करण्याचे काम वृत्तपत्रांनी केले. पत्रकाराने पत्रकारिता देशाच्या विकासासाठी केली पाहिजे. भ्रष्टाचार बाहेर काढून गुन्हेगारांना शासन केले पाहिजे. समाजाला न्याय देण्याचे काम त्यांनी करावे. तेव्हाच पत्रकारिता निर्भिडपणाने होईल. सत्य, विश्वास, आणि प्रामाणिकपणा या तीन गोष्टी आत्मसात केल्याशिवाय पत्रकारिता यशस्वी होणार नाही.

पत्रकारिता ही नेहमी ध्येयवादी राहिली पाहिजे, ती विकावू असू नये. व्यक्ती किती मोठा असू द्या. तो कायद्यापुढे नतमस्तक झाला पाहिजे, नाही तर तो तुरुंगात गेलाच पाहिजे. म्हणून पत्रकाराच्या लेखणीत समाज परिवर्तन करण्याची ताकद असावी. अग्रलेख वाचून लाखो लोक त्या पद्धतीने विचार करतात म्हणून, संपादकांनी अग्रलेख वाचनीय लिहावेत. आपले राज्य का गेले? आणि इंग्रज भारतात का आले? याचे अचूक निदान करणारे महाराष्ट्रातील पहिले विचारवंत, आद्य इतिहासकार, संशोधक, सर्वश्रेष्ठ पत्रकार, म्हणून आचार्य बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांना ओळखले जाते, ते एका ठिकाणी म्हणतात, शिक्षकांने शंभरपट ज्ञान आत्मसात केले तर दहा पट ते आपल्या विद्यार्थ्यांला देऊ शकतात. यातून वाचनाचे महत्त्व विशद करतात, आजच्या काळात वाचन कमी केले जात आहे, म्हणून आपल्याला इतर देशांच्या इतिहासाची माहिती नाही. त्यासाठी वाचन करणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या वेळी भारतावर इंग्रजांचे राज्य होते, त्यावेळी आचार्य जांभेकरांनी स्त्री शिक्षण, पाश्चात्य शिक्षण, धर्म शिक्षण, इतिहास संशोधन, शिलालेख वाचन, ताम्रपट वाचन इत्यादीचे सखोल वाचन केल्यामुळे आज सर्वत्रच त्यांचे नाव आवर्जून घेतले जात आहे.

त्यांना दहा भाषा अवगत होत्या, बंगाली, तेलुगू, कानडी, फार्सी, अरबी, गुजराथी, फ्रेंच व ग्रीक त्यामुळेच ब्रिटिशांच्या काळातील ते विद्वान समजले जात होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचे विद्यार्थी होते. हिंदुस्थानातील पहिले प्रपाठक होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. 1832 साली आचार्य जांभेकरांनी दर्पण नावाचे पाक्षिक काढून समाजातील वाईट रुढी परंपरा काढून टाकण्याचा प्रयत्न केला आणि दर्पण मधूनच समाजसुधारणा, स्वदेशाभिमान लोकांमध्ये रुजवण्यासाठी प्रयत्न केले. म्हणूनच त्यांचा जन्म दिन 6 जानेवारी पत्रकार-दर्पण दिन म्हणून ओळखला जातो, वर्तमानपत्र हा लोकशाहीचा चौथा आधार स्तंभ आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी सामाजिक न्याय व समता प्रस्थापित होण्यास वर्तमानपत्र महत्त्वाची भूमिका पार पाडतात. समाज सुधारला तरच राजकीय स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होईल. व्यक्तीला सार्वजनिक जीवनात विचार मंथन करण्यासाठी वर्तमानपत्रे ही एक फार मोठी शक्ती आहे. तिचा उपयोग समाज बदलासाठी होऊ शकतो, असे ठामपणे आचार्य बाळशास्त्री जांभेकर म्हणतात, आज समाजामध्ये फूट पडत आहे, कोणी -कोणाचे ऐकून घेत नाहीत, मी मोठा आहे, माझा वंश मोठा आहे, म्हणून समाज दुभंगला जात आहे.

आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी फक्त समाजाला उपदेश केला नाही तर अनेक धर्मांतर केलेल्या लोकांना शुद्ध करून स्वधर्मात घेतले. चांगल्या समाजरचनेच्या उभारणीसाठी न्याय व विवेक यांच्या आधारे समाज रचना उभी झाली पाहिजे, असे ते सतत म्हणत असत. आजही पत्रकारांनी समाजातील वास्तव्य बाहेर आणावे. गोरगरिबांना त्रास होणार नाही. गुलाम म्हणून कोणत्याही व्यक्तीला वागणूक दिली जाणार नाही, यांची दक्षता घ्यावी, संविधानाने दिलेल्या अधिकाराचा गैरवापर होता कामा नये, लोकमान्य टिळकांसारखी निर्भिड पत्रकारिता असावी, तरच गुन्हेगारीवर अंकुश बसेल व गुन्हेगाराला जबर शिक्षा होईल, नाही तर सर्वत्रच अंदाधुंदी माजेल, यात तिळमात्र शंका नाही. आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी 1) नीतिकथा 2) सारसंग्रह, 3) भूगोलविद्या, 4) द हिस्ट्री ऑफ इंडिया 5) द हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया इत्यादी ग्रंथाची निर्मिती करून ज्ञान भांडार सर्वांना उपलब्ध करून दिले. आज आपण जांभेकरांनी केलेल्या लिखाणासारखे लेखन करू शकतो का? यांचा प्रत्येकाने विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी भारतीय शिलालेख, ताम्रपट यांची सविस्तर माहिती 'रॉयल एशियाटिक सोसायटीच्या' लोकांपर्यंत वाचण्या साठी उपलब्ध करून दिली होती, म्हणूनच मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर सर जेम्स कार्नेक यांनी 1840 मध्ये 'जस्टीस ऑफ दि पीस' पदवी देऊन यथोचित त्यांचा गौरव केला. आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी हिंदुस्थानातील इंग्रजी राज्याचा इतिहास, इंग्लंडचा इतिहास हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास व ज्ञानेश्वरीचा पहिला छापील ग्रंथ पाठभेदासह त्यांनी संपादित केले. म्हणूनच त्यांना ज्ञानप्रसाराचे आद्य प्रवर्तक म्हणून उभा महाराष्ट्र ओळखतो. आज आपण सर्वांनीच त्यांच्या सारखे निर्भिड वागलो, अनेक ग्रंथ लिहिले, अनेक भाषा शिकल्या, तरच आपला देश महासत्ता होण्यासाठी काही वेळ लागणार नाही. लोकांची आकलन क्षमता वाढविण्याचे महान कार्य त्यांनी केले. उपयोजित ज्ञानाचा प्रसार समाजात व्हावा ही त्यांची तळमळ होती. त्यांचे विचार प्रगमन शील होते म्हणूनच त्यांना ज्ञानप्रसाराचे आद्य प्रवर्तक असे म्हणतात. आजच्या पत्रकारांनी कोणत्याही व्यसनाकडे वळू नये, परिश्रम करून चांगले जीवन जगावे, अंधश्रद्धा व अज्ञान दूर करावे. एखादा व्यक्ती कितीही मोठा असला तरी त्यांनी केलेल्या चुका समाजासमोर प्रकट कराव्यात आणि छोट्या व्यक्तीचे कर्तृत्व सर्वांसमोर दाखवून त्यांचे आत्मभान जागृत करावे. आपली वाणी सडेतोड असावी. वाचावीर न होता कृतीवीर व्हावे. सर्व संपादक, पत्रकार, वार्ताहर बंधूना दर्पण दिनाच्या खूप खूप शुभेच्छा आणि आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने विनम्र अभिवादन !



THE BOMBAY DURPUN


दर्पण



प्रा. बरसमवाड विठ्ठल गणपतराव

अध्यक्ष : विठूमाऊली प्रतिष्ठान खैरकावाडी, ता.मुखेड, जि.नांदेड

E MAIL:BARSAMWADVITTHAL @GMAIL.COM





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

२०२४ हे वर्ष कसे असेल, त्यात कोणकोणत्या घटना घडतील हे आज आपण सांगू शकत नाही. पण एक गोष्ट मात्र निश्चित होईल. राम मंदिर होते आहे. राम, कृष्ण आणि शिव या दैवतांनी आपल्या भारतवर्षाचे वस्त्र उभ्या आडव्या धाग्यांनी विणले आहे. रामराज्याचे गोडवे आपण गातो. त्रेता युगात प्रभू रामचंद्र होऊन गेले. पण आजही इतकी युगे लोटल्यानंतर रामराज्याचे आकर्षण आम्हाला का वाटते ? त्याचे कारण म्हणजे रामराज्य हा भारतीय संस्कृतीचा सुवर्णकाळ होता. त्या काळातील लोकांच्या जीवननिष्ठा अभंग होत्या. नैतिक मूल्ये उच्च प्रतीची होती. स्वयंशिस्त होती. स्वच्छता राखा, एकमेकांचा सन्मान करा, जीवनातील सुखांचा शांततेने आणि संयमितपणे आनंद घ्या यासारख्या गोष्टी शाळांमध्ये शिकवल्या जात नव्हत्या, नागरिकशास्त्राचे पाठ ते लोक कदाचित शाळेत गिरवत नसतील, पण या सगळ्या गोष्टींचे पालन मात्र काटेकोरपणे करीत होते. श्रीमंत माणूस तर कर देत होताच पण गरिबातल्या गरीब माणसालाही मी समाजाचं काहीतरी देणं लागतो असं वाटत होतं. त्या भावनेतून तोही कर देत होता. त्या काळातील मंदिरे ही सांस्कृतिक केंद्रे होती. मंदिरातून भक्तिभाव वाढीला लागत होता आणि समाजशिक्षण होत होते. या सगळ्या आदर्श गोष्टींना कारण म्हणजे त्या काळातील शिक्षणपद्धती तर होतीच पण त्या काळातील ऋषीमुनींनी आणि राजांनी या सगळ्या गोष्टी रुजवण्यासाठी पिढ्यानपिढ्या त्याग केला होता, आपले रक्त आटवले होते. असा समाज उगाच निर्माण होत नाही. त्यासाठी त्याग करणारे आणि उच्च जीवनमूल्ये आचरणात आणणारे आचार्य आणि राजकीय नेते असावे लागतात.



## आनंदी पहाट

## सामाजीकरणाच्या हेतूने सामाजिक न्याय महत्वाचा

आधुनिक केसरी

सामाजिक न्याय, समकालीन राजकारण, सामाजिक विज्ञान, राजकीय तत्त्वज्ञानात, राज्य किंवा समाजातील सर्व व्यक्ती आणि सामाजिक गटांना न्याय्य वागणूक तसेच न्याय्य स्थिती हे विषय सर्वच दृष्टीने महत्वाचे आहेत. सामाजिक न्याय हा शब्द सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संस्था, कायदे किंवा धोरणे यांचा संदर्भ देण्यासाठी देखील वापरला जातो. एकत्रितपणे निष्पक्षता आणि समानता प्रदान करतात तसेच सामान्यतः ज्या चळवळींना न्याय, समानता, समावेश, स्वयं-निर्णय किंवा सध्याच्या इतर उद्दिष्टांचा शोध घेतात त्यांना लागू केला जातो. ऐतिहासिकदृष्ट्या शोषित किंवा उपेक्षित लोकसंख्या असलेल्यांसाठी देखील लागू केलेला दिसून येतो. सैद्धांतिक भाषेत, सामाजिक न्याय हा सहसा न्यायाच्या समतुल्य समजला जातो, तथापि ती संकल्पना परिभाषित केली जाते. काही बाबी ह्या सामाजिक न्यायाच्या समतुल्य किंवा अंशतः वितरीत न्याय म्हणजे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक लाभ अथवा आर्थिक ओझे यांच्या समतुल्य स्वरूपाच्या आहेत. सामाजिक न्यायामध्ये, इतर परिस्थितींबरोबरच, सार्वजनिक पद धारण करून सामान्य हितासाठी योगदान देण्याची आणि लाभ मिळवण्याची समान संधी समाविष्ट असते. सर्व प्रमुख सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संस्थांमध्ये सर्व व्यक्ती आणि गटांच्या समान सहभागाच्या मजबूत ध्येयास प्रोत्साहन देतात. वैयक्तिक आत्म-विकास आणि आत्मनिर्णयाला प्रोत्साहन देणे, दडपशाहीच्या विरुद्ध आणि नंतरच्या वर्चस्वाच्या विरुद्ध म्हणून समजले जात असल्यास त्याचा समावेश सामाजिक न्याय ह्यादृष्टीने केला जातो. एक न्याय्य समाज व्यक्तींच्या क्षमतांना चालना देतो, जे खरोखर मानवी जीवनासाठी आवश्यक आहे. जीवन जगण्याच्या क्षमतांसह, इतरांबरोबरच प्रत्येका सामाजीकरणाच्या हेतूने न्याय मिळणे आवश्यक असल्याचे म्हंटले जाते. एकूणच अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या हमीद्वारे संरक्षित मार्गाने एखाद्याच्या मनाचा वापर करणे आणि राजकीय निर्णय घेण्यामध्ये अर्थपूर्ण सहभाग घेणे ह्याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### मौन सिध्द होते | ब्रह्मरूप ||

सत्कर्माचे ठायी | भयास न थारा ||
पापाचा निचरा | होत जातो ||१||
संचिताचा पाया | पुण्याचा संचय ||
निष्काम अजय | वर्म जाण ||२||
भुतदया भाव | जागता अंतरी ||
सुखी तो संसारी | सर्वकाळ ||३||
नको प्रतारणा | नको निंदा द्वेष ||
हरिनाम घोष | कर्मासंगे ||४||
संत संगतीने | कर्म शुद्ध होते ||
मौन सिध्द होते | ब्रह्मरूप ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी

संगती स्त्रीबाळकाची । आहे साठी जन्माची ।
परी मायेबापीं कैंचीं । मिळतील पुढें ॥४२॥
ऐसें पूर्वीं होतें ऐकिलें । परी ते समईं नाहीं कळलें ।
मन हें बुडोन गेलें । रतिसुखाचा डोहीं ॥४३॥
हे सखीं वाटती परी पिसुणें । मिळाली वैभवाकारणें ।
रितें जातां लाजिरवाणें । अत्यंत वाटे ॥४४॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

गृहस्थाश्रम जग कर्म जो,
मोह बन्धन दुख भास ।
त्यागि भोग दृढ़ ज्ञान पर,
उपरम जगत उदास ।।७८।।
(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय)
०६/०६/७८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : गृहस्थाश्रमातील जे सांसारिक कर्म आहेत, ते वैराग्यवान पुरुषाला अज्ञान, बंधन आणि दुःख सदृश प्रतीत होतात. तो जगतापासून उदासीन (अनासक्त) होऊन सांसारिक विषय भोगांचा पूर्ण ज्ञानपूर्वक त्याग करून साधन-अभ्यासात तथा प्रभू-भक्तीत संलग्न राहातो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

नमस्कार अन्वय व्यतिरेक दोघांतील फरक अन्वय सद्गुरू कृपा खरोखर निःशब्द आहे.माझ्या सारख्या सामान्य माणसाला तेथपर्यंत पोहचण्यासाठी शक्ती नाही. पण असे म्हणून चालणार नाही. देवाची कृपा होण्यासाठी आधी मी देवत्व मिळवण्याचा प्रयत्न करणे तर गरजेचे आहे ना!!! सम्यक आचार, सम्यक विचार,सम्यक वाणी या त्रिसुत्रीवर नियंत्रण ठेवले तर विजय मिळवणे अवघड नाही. आपल्या विचारांची दिशा ही संस्कृती,व संत सहवास लाभावा ह्या साठी संतवचनावर विश्वास ठेवून जगणे गरजेचे आहे. आपल्या अंतरंगात खोल शिरून शब्द स्वरूपाचा खोल अर्थ शोधावा लागतो. अर्थ समजून घ्यावा लागतो.एकचं परमात्म स्वरूप सगळीकडे व्यापून आहे. असा विचार करणे म्हणजे व्यतिरेक होय. परमात्मस्वरूप जाणण्यासाठी व स्वरूपाचा नुभव घेण्यासाठी अन्वय, व व्यतिरेक यांच्या पलीकडे जाणे जरूरीचे आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## गहिनीनाथ


आधुनिक केसरी

पुढे मार्गात मच्छिंद्रनाथांशी भेट होताच, त्याने त्या मुलास भिण्याचे व ओरड करून लगबगीने धावण्याचे कारण विचारिले व तुम्ही भिऊ नका म्हणून सांगितले. तेव्हा पुतळ्याचा मजकूर मुलांनी सांगितला. मुलांचे भाषण ऐकून मच्छिंद्रनाथ विस्मयात पडला व काय चमत्कार आहे तो आपण स्वतः डोळ्यांनी पहावा असे त्याने मनात आणिले आणि मुलांस जवळ बसवून सर्व खाणाखुणा विचारून घेतल्या. मच्छिंद्रनाथांस मुलांनी दुरून ठिकाण दाखविले होतेच. तेथून एक मुलाचा शब्द त्यास ऐकू येऊ लागला. तेव्हा हा करभंजन नारायणाचा अवतार झाला, असे मच्छिंद्रनाथाने समजून मुलास उचलून घेतले व तो मार्गाने चालू लागला. गोरक्षनाथाने पुतळा केला असूनहि तो जवळ दिसेना, म्हणून मच्छिंद्रनाथ मुलास घेऊन जात असता, गोरक्षनाथास हाका मारीत चालला.

## ज्याला समाधान तो भाग्यवान

आधुनिक केसरी

ज्याचे ‘ हवेपण ’ जास्त असते तो गरीब जाणावा, आणि ज्याचे हवेपण कमी असते तो श्रीमंत जाणावा. परमार्थी म्हणजे भिकारी असे ज्याला वाटते, त्याला श्रीमंतीची खरी कल्पनाच नाही. ज्याला नेहमी समाधान वाटते तोच खरा श्रीमंत. आमचा आधार पैशाचा; तो आज आहे अन् उद्या नाही. पायाच जिथे डळमळीत तिथे इमारत कुठे पक्की होईल ? श्रीमान् याचा अर्थ भगवंताशिवाय श्री असणारा असा होऊ नये, याची श्रीमंतांनी काळजी घ्यावी. खरे म्हणजे समाधान हाच खरा पैसा, हीच खरी श्रीमंती, हेच खरे भाग्य, आणि हेच खरे ऐश्वर्य होय. ज्याला समाधान जास्त, तो जास्त भाग्यवान समजावा. समाधान हे आपले आपल्याला घ्यायचे असते, दुसरा कोणी ते आपल्याला देऊ शकत नाही. खरोखर, समाधानासारखे औषधच नाही. ते मिळत नाही म्हणून इतर औषधे घ्यावी लागतात. काळजी नाहीशी झाली की अखंड समाधान, शांती आणि आनंद मिळतो. पैलवानासारखा दिसणारा एक गृहस्थ होता, त्याला विचारले तर तो म्हणाला, “ अहो,



मला मधुमेह झाला आहे; मी आतून पोखरला गेलो आहे ! त्यापेक्षा तुम्ही बरे. ” खरोखर, त्याचप्रमाणे पैशापासून प्राप्त होणाऱ्या ऐश्वर्याची अवस्था आहे. फक्त भगवंताच्या निष्ठेमध्ये समाधान आहे. ते राजवाड्यामध्ये नाहीच नाही, पण ते झोपडीमध्येही नसेल. असमाधान हा रोग सर्वांनाच असल्यामुळे रोगांच्या यादीतून त्याचे नावच निघून गेले आहे ! सध्या जगात पुष्कळ सुधारणा झालेल्या आहेत. पण त्यांनी माणसाला समाधान मिळालेले नाही. जीवन सुखी न होता मनाला जिच्यामुळे हुरहुर लागते ती सुधारणा कसली ? व्यक्ती काय किंवा समाज काय, यांची सुधारणा घडवून आणायला चित्त स्थिर झाले पाहिजे. चित्ताची ही स्थिरता धर्माशिवाय येणे शक्य नाही. हल्लीचे तत्त्वज्ञान नुसते अभ्यासी आहे, अनुभवाचे नाही; म्हणून त्याने खरे समाधान लाभणार नाही. खरोखर, प्रत्येक जीवाला भगवंताची तळमळ लागली पाहिजे. भगवंताशिवाय जो राहतो त्याला सुखदुःख येते; आणि सुख म्हणजे तरी काय, दुःखाची कमतरता ते सुख ! राजापासून रंकापर्यंत प्रत्येकाला काहीतरी मिळावेसे वाटते; म्हणजे प्रत्येकाला काहीतरी कमी आहे. पण कुणी असा विचार करीत नाही की, जे आज कमी आहे ते पूर्वी आपल्याजवळ असताना तरी आपण सुखी होतो का ? याचे उत्तर ‘ नाही ’ असेच मिळते. ताजी जिलबी कल्पनेने खाण्यापेक्षा शिळ्या जिलबीचा तुकडा प्रत्यक्ष खाण्यामध्ये जास्त समाधान आहे. बुद्धीचा आनंद हा उपाधीचा आणि कल्पनेचा आनंद आहे, भगवंताचा आनंद हा उपाधिरहित आहे. हा आनंद मिळवायला भगवंताला शरण जाऊन त्याच्या नामात राहणे हा एकच उपाय आहे.

शनिवार, ६ जानेवारी २०२४

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०३ अंक - १४३

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 6 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-143 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05


# सुधीर मुनगंटीवारांच्या संकल्पनेतून विश्वविक्रम !

## विख्यात शेफ विष्णू मनोहर यांनी बनवली ७ हजार किलोपेक्षा अधिक खिचडी

आधुनिक केसरी न्यूज

प्रा. श्याम हेडाऊ

**चंद्रपूर : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी चंद्रपुरात शुक्रवारी सात हजार किलोपेक्षा जास्त तृणधान्यांची खिचडी बनवून विश्वविक्रम नोंदविला. महाराष्ट्राचे वने, सांस्कृतिक आणि मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपूर येथील चांदा क्लब ग्राउंड येथे सुरू असलेल्या चांदा ॲग्रो 2024 या भव्य कृषी प्रदर्शनात हा विक्रम नोंदविण्यात आला आहे.**



विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार साजरे करण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय मिलेट वर्षानिमित्त मुनगंटीवार यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे विष्णू मनोहर यांनी चंद्रपूर येथे मिलेट खिचडी बनवून संपूर्ण जगाला मिलेटचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. 4 जानेवारीला रात्री एक महाकाय कढई नागपूरहून चंद्रपूर येथे आणण्यात आली, जी क्रेन द्वारे मैदानात उतरविण्यात आली. याबाबत चंद्रपुरकरांमध्ये कमालीची उत्सुकता बघायला मिळाली. पहाटे 6 वाजता विक्रमी खिचडी बनविण्यास सुरुवात झाली. 6 हजार 750 किलो खिचडी बनविण्याचा संकल्प विष्णू मनोहर यांनी केला होता. विविध विभागातील कर्मचारी, भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते यावेळी स्वयंसेवक म्हणून उत्स्फूर्तपणे मदत करीत होते. ही खिचडी बनवण्याची पद्धत रेसिपी आणि मोठमोठ्या कढयांमधून टाकण्यात येणारे पदार्थ याबाबत सर्वच उपस्थितांमध्ये उत्साह दिसून आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2023 'मिलेट वर्ष' म्हणून घोषित केल्यानंतर विष्णू मनोहर यांनी मिलेट्सच्या प्रचार व प्रसारासाठी वर्षभर वेगवेगळ्या शहरात 12 मिलेट्सचे पदार्थ तयार करण्याचा निर्धार केला होता. त्यानुसार आतापर्यंत नागपूर, छत्रपती संभाजीनगर व नाशिक येथे त्यांनी मिलेट्सचे विविध पदार्थ तयार केले आहेत. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून आयोजित चांदा ॲग्रो 2024 मध्ये शेफ विष्णू मनोहर यांनी शुक्रवारी बाजरी हे मलिट धान्य व सर्व भाज्यांचा वापर करून पूर्णान्न असलेली खिचडी तयार केली. त्यासाठी ते १० फूट व्यासाची, ५ फूट कढई, सुमारे ५०० किलो लाकूड वापरण्यात आले. विष्णू मनोहर यांनी याआधी दिल्ली येथे 5 हजार किलोची 'समरसता खिचडी' तयार केली आहे. वनवासी कल्याण आश्रमाच्या डिलिस्टींग कार्यक्रमासाठी त्यांनी 10 हजार किलो मसालेभात व नागपुरातील खासदार सांस्कृतिक महोत्सवात विष्णू मनोहर यांनी श्री गजानन महाराजांना ६ हजार ५०० किलो खिचडीचा नैवेद्य अर्पण केला होता.

**खिचडीचे शिस्तबद्ध वाटप :** 7 हजा किलोपेक्षा जास्त झालेली या खिचडीचे वाटप कसे करावे हा प्रश्न सर्वांनाच उत्सुकतेपटी पडलेला होता. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन आणि चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. विपिन पालीवाल यांनी संपूर्ण यंत्रणा शिस्तबद्ध रीतीने कामाला लावली व खिचडी शाळांमध्ये तसेच शहरातील वस्त्यांमध्ये वाटण्याची व्यवस्था केली. कृषी प्रदर्शनाच्या स्थळी सुद्धा विविध स्टॉल लावून आलेल्या प्रत्येकाला खिचडी देण्यात आली. भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी यावेळी स्वयंसेवक म्हणून अथक परिश्रम घेतले. शहरातील 35 हजार लोकांपर्यंत ही खिचडी पोहोचेल अशी व्यवस्था यावेळी सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली होती. पूर्व नियोजित कार्यक्रमामुळे सुधीर मुनगंटीवार हे नागपूरला असल्याने त्यांनी फोनवरून विष्णू मनोहर यांना शुभेच्छा दिल्या आणि चंद्रपुरात हा विश्वविक्रम केल्याबद्दल त्यांचे आभार मानले.



# महाराष्ट्र केसरी, हिंदकेसरी बकासूर निफाडच्या पक्ष्याकडून चितपट

## फटाके फोडून गुलाल उधळत विजयोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** संपूर्ण महाराष्ट्रात बैलगाडा शर्यतीत एक नंबरवर असलेल्या, महाराष्ट्र केसरी, हिंदकेसरी असे बैलगाडा शर्यतीत मानाचे किताब मिळविलेल्या व थार गाडी जिंकणाऱ्या मुळशी जि.पुणे येथील बकासुराला नैताळे ता.निफाड येथील पक्ष्या बैलाने कल्याणच्या शेलु मैदानात झालेल्या बिनजोड शर्यतीत हरवून चितपट केले. या विजयाबद्दल नैताळेकरांनी फटाके फोडून गुलाल उधळत मोठा विजयोत्सव साजरा केला.

मुळशी जि.पुणे येथील बकासुर नावाचा बैल महाराष्ट्रात नावाजलेला बैल म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्र केसरी, हिंदकेसरी असे मानाचे किताब, थारगाडी व इतरही मोठमोठे बक्षीसे बकासुराने जिंकली आहेत. सिकंदर ठरलेल्या या बकासुराला नैताळेचे बैलगाडा मालक रतन यशवंत बोरगुडे यांचा पक्ष्या तर गजानन म्हात्रे यांच्या शंकर बैलाने कल्याण येथील शेलु मैदानात बिनजोड शर्यतीत हरवून इतिहास घडवला आहे. त्याच्या या कामगिरीने निफाड तालुक्याचे नाव राज्यभरात उंचावल्याने पक्ष्या बैलाचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

पक्ष्या बैलाचे संगोपन करणारे सुनील बोरगुडे व अनिल बोरगुडे यांनी सांगितले की, ६ वर्षापासून आम्ही पक्ष्याचा सांभाळ करतो. त्याला रोज सकाळी अर्धा किलो खारीक, दोन किलो डाळी, महिन्यातून दोन तीन वेळा अंडी व दूध पाजतो. त्याचप्रमाणे बदलत्या ऋतू नुसार त्याला गार, गरम पाण्याने आंघोळ घालतो. ज्या दिवशी बैलगाडा शर्यत असते त्या दिवशी एक पिकअप गाडी व दहा जणांना बरोबर घ्यावे लागते.पक्ष्या तीन वर्षात ४४३ बैलगाडा शर्यती खेळला त्यापैकी ४११ वेळा विजयी झाला आहे तर केवळ ३२ वेळा पराभव झाला आहे. फुलगावच्या घाटात घाटाचा राजा व बुलेटचा मानकरी, जाधव वाडीच्या घाटात शाईन मोटारसायकल असे अनेक बक्षिसे पक्ष्याच्या नावे आहेत. या शर्यतीसाठी टिलू शिंदे, ज्ञानेश्वर बनसोडे, ऋषिकेश खुळे, सागर खुळे, धनंजय खुळे, सुदाम घुले, सूर्यभान भवर, वाल्मीक बोरगुडे, पप्पू जाधव, विशाल घायाळ, कृष्णा बोरगुडे, गौतम बोरगुडे, बापू घायाळ, किरण घायाळ, सर्जेराव बोरगुडे, महेश बनकर, प्रकाश काकडे, पुंडलिक दराडे या चमूने परिश्रम घेतले.

पक्ष्याच्या विजयाबद्दल लासलगाव बाजार समिती संचालक राजेंद्र बोरगुडे, ग्रा.पं.नवनाथ बोरगुडे, देविदास बोरगुडे, शिवाजी बोरगुडे, दत्तात्रय भवर, किशोर बोरगुडे, सोपान बोरगुडे, वैभव गाजरे, दिलिप घायाळ, सुनिल बोरगुडे, योगेश बोरगुडे, आण्णा बोरगुडे आदींसह ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.




# संपत्तीचा वाद

आधुनिक केसरी

राजस्थानच्या बिकानेर पूर्व विधानसभेच्या भाजप आमदार सिद्धी कुमारी यांनी नामांकनादरम्यान दिलेल्या प्रतिज्ञापत्रात संपत्ती 1.11 अब्ज रुपये असल्याचे सांगितले. 2018 मध्ये सिद्धी कुमारी यांची संपत्ती 8.89 कोटी रुपये होती. याशिवाय स्थावर मालमत्तेत हिमाचल प्रदेशातील चंबा येथील सुमारे 150 बिघा जंगलाचा समावेश आहे. बिकानेरच्या गजनेर ग्रामपंचायतीत त्यांची 247 बिघे जमीन आहे. याशिवाय देशातील अनेक प्रसिद्ध ठिकाणांवरील मौल्यवान वनस्पती त्यांच्या नावावर आहेत. जुनागढमध्ये असलेल्या प्राचीन संग्रहालयातही सिद्धी कुमारी यांचा हिस्सा आहे. मात्र, याच सिद्धी कुमारी यांनी मालमत्तेच्या वादावरून पोलीस स्टेशन गाठले. बिकानेर राजघराण्याच्या सदस्या भाजप आमदार सिद्धी कुमारी यांच्या मालमत्तेवरून वाद वाढतच चालला आहे. सिद्धी कुमारी यांनी त्यांच्या आत्या आणि कुटुंबातील इतर सदस्यांविरुद्ध न्यायालयात तक्रार दाखल केली. सिद्धी कुमारी यांनी आत्यावर फसवणूक, खोटी कागदपत्रे तयार करणे, खोटे पुरावे आणि आणि चुकीची वस्तुस्थिती मांडल्याबद्दल आरोप केला आहे. न्यायलयाने सिद्धी कुमारी यांच्या तक्रारीची दखल घेऊन पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. आमदार सिद्धी कुमारी यांच्या आत्या आणि माजी महाराजा करणी सिंह यांची कन्या राज्यश्री यांच्यामध्ये मालमत्तेवरून सुरु असलेला वाद पुन्हा उफाळून आलाय. या प्रकरणी त्यांनी येथील प्रथम न्यायालयात तक्रार केली. न्यायालयाने ते मान्य करत पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार बिकानेरच्या सदर पोलीस ठाण्यात आत्या राज्यश्री कुमारी, मयूर ध्वज गोहिल यांच्यासह स्वीय सहाय्यक राजेश पुरोहित, गौरव बिनानी, पुखराज आणि रितू चौधरी यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. न्यायालयाच्या आदेशानुसार सदर पोलीस ठाण्यात आमदार सिद्धी कुमारी यांच्या अहवालाची नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ४६७, ४६८, ४२०, ५००, ५०१ आणि १२० बी अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास सदर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक महेंद्र सिंग यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. दरम्यान, सिद्धी कुमारी यांची आत्या राज्यश्री यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. यामध्ये त्यांनी सिद्धी कुमारी यांनी उमेदवारी अर्ज भरताना चुकीची माहिती दिली आहे. त्यांनी आपल्या संपत्तीचा दिलेला तपशील चुकीचा आहे असे म्हटले आहे.

# दर्पण: समाज प्रबोधनाची नवी दृष्टी



डॉ.राजू पाटोदकर
उपसंचालक, पुणे,
9892108365

आधुनिक केसरी

**सुप्रसिध्द माध्यम तज्ज्ञ ए.ए. बेर्जर यांनी म्हटल्याप्रमाणे वृत्तपत्रांचा इतिहास हा जनतेचा आणि चळवळींचा इतिहास असतो. वृत्तपत्रे सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेला गती देतात. त्याद्वारे लोकांना सामाजिक संकेत, कार्यात्मक भूमिका आणि मूल्य याबाबतचे शिक्षण दिले जाते. त्यानुसार आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी केवळ लोककल्याण आणि लोकशिक्षण असाच उदात्त हेतू नजरेसमोर ठेऊन मुंबई येथे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या इंग्रजी आणि मराठी भाषेतील पाक्षिकाची सुरूवात करून मराठी वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रोवली. त्या घटनेचे स्मरण म्हणून राज्यात प्रतिवर्षी ६ जानेवारी रोजी 'दर्पण दिन' साजरा केला जातो, त्यानिमित्त हा लेख...**

१८३२ चा काळ, अर्थातच इंग्रजांच्या अधिपत्याचा काळ होता. राष्ट्रभक्तीसाठी समाजास प्रबोधनाची मोठी गरज होती. इंग्रजांच्या हातात आपले राष्ट्र असताना आपल्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करुन, परिस्थितीची जाणीव करुन देण्यासाठी एखादे वृत्तपत्र असावे, असे बाळशास्त्रींना वाटले आणि त्यांनी दर्पण सुरु केले. भारतीय जनतेच्या आशा-अपेक्षांचे प्रतिबिंब आपल्या 'दर्पण' वृत्तपत्राच्या माध्यमातून तत्कालिन राज्यकर्त्यांना दिसावे आणि त्याचबरोबर परकीय राज्यकर्त्यांच्या कार्याची ओळख, त्याचे स्वरुप जनतेच्याही लक्षात यावे, असा दुहेरी संवाद दर्पणद्वारे बाळशास्त्रींनी साधला. थोडक्यात सरकार आणि जनता यातील दुवा म्हणून वृत्तपत्रांनी काम करावे या नितीतत्त्वाचे पालन दर्पणच्या माध्यमातून बाळशास्त्रींनी केले.

**दर्पणचे अंतरंग :** दर्पण हे पहिल्या वर्षी जवळपास तीनशे- चारशे लोकांपर्यंत पोहोचले. त्याचे वर्गणीदार २८० होते. साधारणतः त्याकाळी एखादे वृत्तपत्र ५० लोक वाचत, असे समजले तरी एकूणच दर्पण जवळपास १२ ते १५ हजार वाचकांपर्यंत पोहोचत असे. 'दर्पण'मध्ये एकही जाहिरात त्यांनी छापली नाही. अगदी स्वतःचे पैसे टाकून जवळपास आठ वर्षे लोकांसाठी वृत्तपत्र सुरु ठेवले. भाऊ महाजन यांच्या सहकार्याने मराठी तर स्वतः इंग्रजी मजकूराची बाजू ते 'दर्पण'साठी सांभाळत. त्यामुळे 'दर्पण' मधील मजकूराचा दर्जा उच्च होता. दर्पण पाक्षिकात अर्धा मजकूर इंग्रजी तर अर्धा मराठी असे. तसेच डेमी आकाराची ८ पाने दोन कॉलम मजकूरासह यात असत. सरकार आणि जनता या दुहेरी संवादासाठी हा दोन द्विभाषिय मजकूर असे. दर्पणला त्यावेळी मोठी प्रतिष्ठा मिळाली. अगदी मुंबईत प्रसिध्द होत असलेल्या तत्कालिन इंग्रजी, गुजराथी, बंगाली भाषेतील वृत्तपत्रामध्येही दर्पणमध्ये प्रसिध्द झालेली लेख, वृत्ते पुनर्प्रकाशित होत असत. २६ जून १८४० रोजी दर्पणचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. पुढे बाळशास्त्रींनी दिग्दर्शन हे मासिकही सुरु केले.


**स्त्रीमुक्तीचे प्रणेते :** दर्पणकार हे स्त्री-पुरुष समानतेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी आपल्या दर्पण या पत्रातून मांडलेले स्त्रीमुक्तीविषयक विचार हे त्यांच्या प्रगमनशील सामाजिक सुधारणा विचाराचे प्रतीक होते. त्यांनी स्त्रीप्रथा बंदीचे स्वागत केले. तसेच विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. स्त्रियांची अवनती होण्याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव हे होय, हे त्यांनी अचूकपणे ओळखले होते. तसेच सतीची चाल, बालविवाह, बालविधवा पुनर्विवाह, बालहभत्या अशा सामाजिक प्रश्नासाठीही त्यांनी मोठे प्रयत्न केले. ६ जून १८३४ च्या दर्पणमध्ये "दूराग्रही चालीवर झोड" या मथळ्याचे पत्र लिहिले. त्यात स्त्री शिक्षणाचे विचार स्पष्टपणे मांडले. तर १८६७ मध्ये एका अंकात त्यांनी बालविधवांच्या समस्येवरही आपले विचार समर्थपणे मांडले आहेत. एकूणच त्यांच्या स्त्रीमुक्ती विचारांचा परामर्श घेतला असता आपल्याला त्यांच्या प्रगत सामाजिक विचारांचे यथार्थ ज्ञान होऊ शकते.

**पत्रकारिता : शैली व अभिव्यक्ती :** आचार्य बाळशास्त्री जांभेकरांच्या वृत्तपत्रीय लेखनाची अभिव्यक्ती ही जिवंत आणि प्रवाही ठरते. त्यांच्या शैलीदार अभिव्यक्तीची विविध वैशिष्ट्ये आहेत. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण मध्ये सत्य आणि वस्तुनिष्ठतेवर भर दिला. त्यांच्या मते जे शुद्ध मनोरंजन इच्छितात त्यांचे समाधान दर्पण मधील लहान लहान गोष्टींमुळे होईल. सातारचे सती प्रकरण असो की, विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न असो अथवा जातिभेदाचा प्रश्न असो, आचार्य बाळशास्त्रींच्या लेखणीने तलवारीच्या पात्याचे रुप धारण करत परखड विवेचन केले . निर्भीड मतप्रतिपादन हा जांभेकरांच्या शैलीचा आणखी एक स्थायिभाव होता. पत्रकारितेचे श्रेष्ठ संकेत व मूल्ये जांभेकरांनी विचारपूर्वक जपले. जांभेकरांनी उपयुक्ततावादी आणि उदारमतवादी दृष्टीकोनातून स्वतंत्रपणे विचार मांडले आणि प्रगत विलायती समाजातील नव्या कल्पना स्वभाषेतून आपल्या वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील इंग्रजी अमलातील ज्ञानाचा नवा प्रकाश म्हणजे बाळशास्त्री जांभेकर. इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीच्या काळातील एक उच्चविद्याविभूषित, पंडिती व्यक्तिमत्व म्हणजे आचार्य बाळशास्त्री जांभेकर होत. भारतातील पहिले प्रोफेसर म्हणजे प्रपाठक होण्याचा बहुमान १८३४ यावर्षी बाळशास्त्रींना मिळाला. शिक्षण विभागाचे संचालक झाले. तसेच त्यांनी विविध विषयांवर ग्रंथ लिहिले. यात प्रामुख्याने भूगोल, इतिहास, भौतिकशास्त्र, गणित,खगोलविद्या, मानसशास्त्र आदी विषयांचा समावेश आहे. याचबरोबर त्यांनी बालव्याकरण, भूगोलविद्या, सारसंग्रह आणि नीतीकथा हे चार ग्रंथही लिहिले आहेत. एलिफिन्स्टनकृत हिंदुस्थानाच्या आधारे त्यांनी इतिहास रचला. हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास हा ग्रंथ १८५१ यावर्षी त्यांच्या निधनानंतर प्रसिद्ध झाला. त्यांच्या रचनात्मक कार्यामुळे महाराष्ट्रात सार्वजनिक जीवनाला एक नवे वळण लाभले. त्यांच्या या महत कार्यामुळे मराठीतील आद्यसंपादक होण्याचा बहुमान बाळशास्त्रींना मिळाला.




१९२ वर्षापूर्वी आचार्य बाळशास्त्रींनी दर्पणच्या रुपाने जो समाज प्रबोधनाचा वृक्ष लावला तो आज प्रचंड वाढला आहे. महाराष्ट्रात वृत्तपत्र क्षेत्रात झालेली अभूतपूर्व क्रांती ही त्याचाच प्रत्यय आहे. आचार्य बाळशास्त्रींच्या या महान कार्यास शतशः प्रणाम !

# हमास नेत्याच्या हत्येनंतर युद्धाची आग लेबनॉनपर्यंत



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**इस्रायल आणि हमास यांच्यात ७ ऑक्टोबर२०२३ पासून भयंकर युद्ध सुरू आहे. हे युद्ध अजूनही थांबण्याचे नाव नाही उलट युद्ध अधीक तीव्र होताना दिसत आहे. इस्त्रायली लष्कराने बुधवारीही गाझा पट्टीवर हल्ला सुरूच ठेवला. त्याचवेळी बेरूतमध्ये हमासच्या उपनेत्याच्या हत्येनंतर हे युद्ध लेबनॉनपर्यंत पोहोचले आहे. दरम्यान, नागरिकांना पॅलेस्टाईन प्रदेशाच्या उत्तरेकडील निर्वासित छावणी सोडण्यास सांगण्यात आले आहे.हमास नेत्याच्या हत्येनंतर युद्ध वाढण्याची भीती अधिक तीव्र झाली आहे. कारण इस्रायलने लेबनीजची राजधानी बेरूतमध्ये ड्रोन हल्ल्यात सालेह अल-अरौरी ठार झाल्याची पुष्टी किंवा नाकारलेली नाही.**

इस्त्रायली हल हमासचे प्रमुख राजकीय नेते सालेह अरोरी यांच्या मृत्यूमुळे 'हमास' आणि इस्रायलमधील पश्चिम आशियातील संघर्ष चिघळण्याचा धोका वाढला आहे. इस्रायलविरुद्ध युद्ध सुरू झाल्यापासून सालेह अरोरी 'हमास'चे सर्वात वरिष्ठ नेते होते.सालेह अरोरी हमासच्या लष्करी शाखेचे संस्थापकही होते. त्यामुळे त्यांच्या मृत्यूचा बदला 'हमास' घेण्याची शक्यता आहे. इस्रायलच्या 'ड्रोन'ने हा हल्ला केल्याचे लेबनॉनच्या अधिकृत राष्ट्रीय वृत्तसंस्थेने म्हटले आहे. इस्रायली अधिकाऱ्यांनी मात्र यावर भाष्य करण्यास नकार दिला. अरोरी यांच्या मृत्यूनंतर लेबनॉनच्या शक्तिशाली बंडखोर संघटना 'हिजबुल्लाह'ही मोठा बदला घेण्याची भीती आहे. 'हिजबुल्लाह'चा गड असलेल्या बैरूतमधील शियाबहुल जिल्ह्यातील एका निवासी इमारतीवर हा हल्ला झाला. त्यानंतर 'हिजबुल्लाह'चे नेते सय्यद हसन नसरल्लाह यांनी लेबनॉनमधील पॅलेस्टिनी अधिकाऱ्यांना लक्ष्य करणाऱ्या इस्रायली हल्ल्यांचा पुरेपूर बदला घेण्याची शपथ घेतली आहे. सुमारे तीन महिन्यांपूर्वी गाझामध्ये इस्रायलच्या लष्करी कारवाईला सुरुवात झाल्यापासून हिजबुल्लाह आणि इस्रायली सैन्यात इस्रायल-लेबनीज सीमेवर जवळजवळ दररोज चकमक उडत आहे. मात्र, 'हिजबुल्लाह'ने आतापर्यंत मोठा हल्ला चढवलेला नाही. मात्र, 'हिजबुल्लाह'ने या हल्ल्यानंतर मोठी कारवाई केल्यास इस्रायलच्या उत्तर सीमेवरील संघर्ष सर्वंकष युद्धात रुपांतरित होऊ शकतो. विशेष म्हणजेअमेरिकेचे परराष्ट्रमंत्री अँटनी ब्लिंकन यांच्या या भागातील दौऱ्यापूर्वी ही हत्या झाली आहे. अमेरिकेने 'हिजबुल्लाह' आणि त्याचा मित्र इराणला संघर्ष-हिंसाचार न वाढवण्याचा इशारा वारंवार दिला आहे. इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी जोपर्यंत 'हमास'चा समूळ नायनाट होत नाही आणि गाझामध्ये 'हमास'ने ओलीस ठेवलेल्या १०० हून अधिक लोकांना सोडवले जात नाही तोपर्यंत गाझामधील आक्रमण सुरूच ठेवण्याचा निर्धार केला आहे. त्यांनी म्हटले, की या युद्धास आणखी काही महिने लागू शकतात.इस्रायली अधिकाऱ्यांनी अलीकडेच काही दिवसांत 'हिजबुल्लाह'कडून सीमेपलीकडून हा गोळीबार थांबेपर्यंत कारवाई तीव्र करण्याचा इशारा दिला आहे. बिन्यामिन नेतान्याहू आणि अन्य इस्रायली अधिकाऱ्यांनी 'हमास'च्या नेत्यांना वारंवार इशारा दिला आहे, की ते जिथे असतील तिथे त्यांना संपवले जाईल.इस्रायली लष्कर कोणत्याही परिस्थितीसाठी पूर्णपणे तयार आहे. याशिवाय, सालेह अल-अरौरीच्या हत्येमुळे हमासच्या ताब्यातील वेस्ट बँक, लेबनॉन-इस्त्रायल सीमेवर उपस्थित असलेल्या हिजबुल्लाह सैन्याने आणि लाल समुद्रातील शिपिंग लेनमध्येही युद्ध वाढू शकते, असे संकेत मिळतात.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# बस-दुचाकीचा भीषण अपघात

## दुचाकीचालक ठार : महिला जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** देवगिरी कारखाना फाटा ता. फुलंब्री या फाट्यापासून फुलंब्रीकडे जात असताना दुचाकी आणि ट्रॅव्हल्स बस चा भिषण अपघात झाला. या अपघातात दुचाकी चालक ठार झाला असून एक महिला जखमी आहे त्यास रुग्णालयात हलविण्यात आले आहे. प्रत्यकषदर्शींनी सांगितल्यानुसार दुचाकीवर महिला आणि पुरुष दोघेजण खुलताबाद कडून फुलंब्रीकडे जात असताना समोरून येणाऱ्या ट्रॅव्हल बस ला जोराची धडक झाल्याने दुचकीचालक रस्त्यावर फेकले जाऊन दुचाकी चालक मच्छिंद्र शंकर मातकर रा.वेरुळ ता.खुलताबाद हे ठार झाले व सोबत असलेली महिला किरकोळ जखमी झाली. ट्रॅव्हल्स बस चालक बस रस्त्यातच उभी करुन घटनास्थळावरून पसार झाला आहे.





जखमींना उपचारासाठी रुग्णवाहिकेद्वारे रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी तपासून एकास मृत घोषित केले. अपघाताविषयी अधिक तपास फुलंब्री पोलिस स्टेशन अंतर्गत सुरु आहे. अपघातानंतर तेथे असलेल्या नागरिकांनी रस्त्याच्या दुभाजकाविषयी विषयी संतप्त प्रतिक्रिया दिल्या.फुलंब्री पासून ते देवगिरी कारखाण्यापर्यत या रस्त्यावर जे दुभाजक तयार करण्यात आले आहे ते अत्यंत चुकीचे असून त्यामुळेच या ठिकाणी हे अपघात होत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी दिली कारण हे रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी दोन ठिकाणी दुभाजक करण्यात आली आहे आणि मधिल मुख्य रस्त्याला दुभाजक नाही, येणारी जाणारी वाहने अनेक वेळा समोरासमोर येतात आणि अपघात होण्याची शक्यता असते दुभाजकांच्या दोन्ही बाजूने जो रस्ता आहे तो विनाकारण मोकळा आहे आणि त्यामूळे मधील रस्ता अरुंद झाला आहे तर हे अपघात होऊ नये यासाठी हे बाजूचे दुभाजक काढून टाकण्यात यावे आणि एकच दुभाजक रस्त्याच्या मध्यभागी ठेवण्यात यावे अशी मागणी यावेळी ग्रामस्थांनी केली.



# आ. शामसुंदर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली लोहा येथे समन्वय समितीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तहसील कार्यालयात काल 2 जानेवारी रोजी लोहा-कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली लोहा तालुका समन्वय समितीची बैठक संपन्न झाली, यावेळी या बैठकीला खरेदी विक्री संघाचे सभापती तथा समन्वय समिती सदस्य स्वप्निल पाटील उमरेकर, शेकाप ग्रामीण जिल्हाध्यक्ष तथा समन्वय समितीचे सदस्य अवधूत पाटील शिंदे, हातनीचे माजी सरपंच तथा समन्वय समितीचे सदस्य सुनील भदरगे, समन्वय समिती सदस्य सिद्धू पाटील वडजे, सदस्य अश्विनी कापुरे सह सर्व कार्यालयीन प्रमुखांची उपस्थिती होती, यावेळी आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी घरकुल,कृषी, वीज, शिक्षण,पंचायत समिती तसेच गटविकास अधिकारी,बाल विकास प्रकल्प अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी यासह सर्व कार्यालयीन प्रमुखांच्या कामाचा आढावा घेतला, यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी मारुती थोरात, तहसीलदार शंकर लाड,पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर,गटविकास अधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पवार, सरपंच प्रतिनिधी पुंडलिक पाटील बोरगावकर, संचालक सुधाकर सातपुते, सचिन कुदळकर, शेकाप तालुकाध्यक्ष नागेश हिलाल, नायब तहसीलदार अशोक मोकले सह पदाधिकारी कार्यकर्ते व सर्व विभागाचे कार्यालयीन प्रमुख या बैठकीला उपस्थित होते.

# विकसित भारत संकल्प यात्रेतून शासकीय योजनेचा जागर

## नागरिकांनी घेतली केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोनारकर**

**धर्माबाद :** केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती देणारी विकसित भारत संकल्प यात्रेला धर्माबाद शहरात प्रचंड प्रतिसाद मिळाला असून शेकडो उपस्थित नागरिकांनी त्यामध्ये स्त्रिया पुरुषांचा मोठा समावेश होता. त्यांनी भारत शासनाच्या विविध योजनांची माहिती घेत जागेवरच लाभ घेतला. उपरोक्त कार्यक्रमास तहसिलदार शंकर हांदेश्वर, धर्माबाद नगरपालिकेचे मुख्याधिकारी सतीश पुदाके, आकाशवाणी केंद्र नांदेडचे कार्यक्रमाधिकारी विश्वास वाघमारे, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. वेणूगोपाल पंडित, भाजपाचे शहराध्यक्ष रमेश गौड, साईनाथ शिरपूरे, भाजप युवकचे शहराध्यक्ष सतीश मोटकुल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहिती सामान्यांपर्यंत पोहोचावी तसेच तळागाळातील नागरिकांना या योजनांचा लाभ घेता यावा. या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात मोहीम ता. 15 नोव्हेंबर 2023 पासून सुरू करण्यात आली आहे. यावेळी केंद्र शासनाकडून प्रकाशित झालेल्या कॅलेंडरचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या प्रास्ताविकात नगरपालिकेचे मुख्याधिकारी सतीश पुदाके यांनी विकसित भारत संकल्प यात्रेद्वारे संपूर्ण भारतभर केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती घेत त्याचा लाभ घेण्याचे आवाहन करत असून त्यामध्ये पंतप्रधान स्वयंनिधी योजना, पंतप्रधान आवास योजना, स्वच्छ भारत मिशन, आयुष्यमान कार्ड शिबिर, उज्वला गॅस योजना, आरोग्य तपासणी शिबिर, आधार अपडेट योजना, पंतप्रधान मुद्रा लोन योजना आदींची सविस्तर माहिती देत सदरील योजना धर्माबाद नगरपालिका कार्यकक्षेत किती प्रमाणात राबवल्या गेल्या व भविष्यात त्या पूर्ण करण्याचा संकल्प त्यांनी बोलून दाखविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत कुडाळे यांनी केले. यशस्वीतेसाठी नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक रुक्माजी भोगावार, लेखापाल गुरुनाथ कस्तुरे व सर्वच नगरपालिका कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**लाभार्थ्यांची विशेष खबरदारी :** केंद्र सरकारच्या वतीने सर्वसामान्य नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक योजनेची माहिती यावेळी देण्यात आली . तसेच नगर परिषद हद्दीतील प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना सदरील योजनेचा लाभ घेताना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही . यासाठी विशेष खबरदारी घेतली जाईल . अशी ग्वाही नगर परिषद मुख्याधिकारी सतिष पुदाके यांनी दिली . प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषद कार्यालयाने कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले होते .

# भा.ज.पा. प्रदेश सचिवपदी प्रा. गिरीष नागरगोजे

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** 1 जानेवारी रोजी मुंबई येथे झालेल्या भारतीय जनता पक्षाच्या बैठकीमध्ये भारतीय जनता पार्टी च्या भटके विमुक्त आघाडी महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी प्रा.गिरीश कमलाकरराव नागरगोजे, यांची निवड करण्यात आली, निवडीचे पत्र माननीय,राहुल भैया केंद्रे, प्रदेश अध्यक्ष भटके विमुक्त आघाडी, महाराष्ट्र राज्य यांनी काढले आहे व खास अभिनंदन केले ह्या निवडी बद्दल राज्याचे गृहमंत्री ना.देवेंद्र फडवणीस, प्रदेश अध्यक्ष आ.चंद्रशेखर बावनकुळे साहेब, राष्ट्रीय सचिव रणरागिणी पंकजा ताई मुंडे, खासदार प्रीतम ताई मुंडे, माननीय केंद्रीय मंत्री डॉ.भागवत कराड साहेब,खासदार प्रताप राव जी चिखलीकर साहेब, नांदेड, माजी आमदार गोविंद अण्णा केंद्रे खासदार सुधाकर जी शृंगारे, लातूर, खासदार रक्षताई खडसे, जळगाव, भाजप जिल्हा अध्यक्ष. संतुकजी हंबर्डे साहेब, आमदार तुषार जी राठोड, आमदार राजेश जी पवार साहेब, आमदार गोपीचंद पडळकर साहेब, देविदास जी राठोड साहेब प्रदेश सचिव, भाजप, प्रवीण चिखलीकर, अनिल जी बोरगावकर, प्रदेश सचिव युवा मोर्चा भगवान जी राठोड साहेब,उपजिल्हा अध्यक्ष भाजप नांदेड, तथा माजी तालुका अध्यक्ष, भास्कर जी पवार , युवा मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य,दीपक कानवटे, युवा नेते प्रभाकर जी केंद्रे सरपंच तळ्याची वाडी, बंडू पाटील वडजे,युवा मोर्चा उपाध्यक्ष, सरपंच अर्जुन भाऊ राठोड, राजू भाऊ बोडके, बाळु पाटील कदम प्रवीण दांगते, नारायण नागरगोजे, गणराज केंद्रे , सुरेश नागरगोजे, सुरेश नागरगोजे, बळी राठोड आदींनी अभिनंदन केले.





# ब्रह्माकुमारीजकडून पत्रकारांच्या सत्काराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या वतीने व ब्रह्माकुमारीज मीडिया विंग यांच्या पुढाकारातून आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त ६ जानेवारी रोजी पत्रकारांचा सत्कार करण्यात येणार आहे.

स्थानिक प्रजापीता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विदयालयाच्या वतीने ब्रह्माकुमारीज मीडिया विंग च्या पुढाकाराने व संचालिका ब्रह्माकुमारी ज्योती दीदींच्या मार्गदर्शनाखाली आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर जयंती व मराठी पत्रकार दिनाच्या निमित्ताने 6 जानेवारी शनिवारी सकाळी 9 वाजता रिसोड शहरासह तालुक्यातील अधिकृत प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीयात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सर्व सन्माननीय पत्रकारांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.पत्रकार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ब्रह्माकुमारीज सेवा केंद्र रिसोड च्या संचालिका ब्रह्माकुमारी ज्योती दीदी तर प्रमुख अतिथी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर व सत्कार मूर्ती म्हणून तालुक्यातील सर्व पत्रकार उपस्थित राहणार आहेत.मागील अनेक वर्षांपासून ब्रह्माकुमारीज मीडिया विंग सदस्य रवि अंभोरे यांच्या पुढाकाराने व ब्रह्माकुमारी ज्योती दीदींच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारांचा सत्कार केला जातो.यावर्षी ही ब्रह्माकुमारीज सेवा केंद्र सिव्हिल लाईन रिसोड येथे सर्व पत्रकारांचा सपत्नीक सत्कार सोहळ्याचे आयोजन केले आहे.सर्व पत्रकारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन ब्रह्माकुमारीज मीडिया विंगच्या वतीने करण्यात आले आहे.

# अंगणवाडी सेविका-मदतनीस संपावरच

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** अंगणवाडी सेविका मदतनीस यांचा बेमुदत आंदोलन संपता संपेना व त्यामुळे अंगणवाडीतील सर्व सेवा ठप्प असुण महिना दिड महिना वारी बाळांचे लसीकरण डोसचा कार्यभार ही आता अंगणवाडी ऐवजी आरोग्य केंद्रात करावे लागत आहे.

अंगणवाडी सेविका व मदतनीस गत चार नोव्हेंबर पासुन आपल्या विविध मागण्या साठी बेमुदत संप आंदोलन वर आहे.ठिकठिकाणी कार्यालयांवर निवेदन देत ते मागण्या मान्य करा म्हणत आंदोलन करत आहे.परंतु त्यात तोडगा निघत नाही.त्यामुळे इकडे अंगणवाडी बंद असल्याने आवश्यक व अतिआवश्यक सेवा खंडित ठप्प पडून आहे.तर नवजात बालक यांचे डोस लसीकरण अतिआवश्यक असल्याने त्याचा कार्यभार आता आरोग्य विभाग कर्मचाऱ्यांवर येवून पडला आहे.आरोग्य कर्मचारी अंगणवाडी बंद असल्याने आरोग्य केंद्रात आशाबहेन यांच्या माध्यमातून बोलवणा करुन आरोग्य केंद्रातच डोस लसीकरण प्रक्रिया राबवत असल्याचे केंद्रांत दिसून आले आहे.केंद्रात सुपरवायजर सिस्टर हे कार्य करत असल्याचे दिसून आले आहे. अंगणवाडी अभावी अनेक कार्य ठप्प पडून आहे.हे विशेष.



# देवीच्या मारक रूपाची उपासना केव्हा करणार ?

आधुनिक केसरी

**सध्या मार्गशीर्ष महिना सुरु आहे. या महिन्यातील गुरुवारी बहुतांश महिला श्री महालक्ष्मी व्रत करतात. या दिवशी दिवसभर उपवास केला जातो. चौरंगावर श्री महालक्ष्मीच्या रूपाने कलश मांडून तिची मनोभावे पूजा केली जाते. सुगंधी फुलांचा गजरा किंवा वेणी माळली जाते. देवीसमोर श्री महालक्ष्मी व्रताची कथा आणि महती महिती यांचे वाचन केले जाते. देवीची आरती केल्यावर देवीला पाच फळांचा नैवेद्य दाखवला जातो. गेल्या काही वर्षांपासून पूजेच्या कलशावर देवीचा मुखवटा लावून त्यावर वस्त्र आणि दागिने यांची सजावट करण्याची पद्धत रूढ होऊ लागली आहे.**

अनेक महिला हौस म्हणून पूजेच्या चौरंगाभोवती आकर्षक फुलांची सजावट करतात, दाराबाहेर रांगोळी काढून दारात पणत्या लावतात. नैवेद्यासाठी गोडधोड बनवतात. महाराष्ट्रात बहुतांश प्रांतात महिला हे व्रत करत असून वर्षागणिक व्रत करणाऱ्या महिलांच्या संख्येत वाढच होत आहे. शहरासारख्या ठिकाणी नोकरी व्यवसाय करणाऱ्या महिलाही वेळात वेळ काढून हे व्रत करतात. मार्गशीर्ष महिन्याच्या अखेरच्या गुरुवारी व्रताचे उद्यापन केले जाते त्यानिमित्ताने सवाष्ण महिलांना वाण, गजरा अथवा फुल आणि हळद कंकू दिले जाते. श्री महालक्ष्मी देवीप्रती असलेली श्रद्धा याबरोबरच महालक्ष्मी देवीची कृपा आपल्या कुटुंबावर सदैव राहावी हा सकाम हेतूही या व्रतामागे दडलेला असतो.

शालेय जीवनात ज्ञानार्जन करून आपण श्री सरस्वती देवीची उपासना करत असतो. अनेक महिला आज उच्च शिक्षण घेऊन न्याय, वैद्यक, संशोधन, सैन्य, पोलीस आदी सर्वच क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. उद्योजक क्षेत्रातही अनेक महिलांनी आज उत्तुंग भरारी घेतली आहे. राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढू लागला आहे. त्या त्या क्षेत्रातील ज्ञान घेऊन त्यामध्ये पारंगत होणे ही श्री सरस्वती देवीची उपासनाच आहे. शक्तीची अर्थात देवीची तीन प्रमुख रूपे आहेत. त्यांतील श्री सरस्वती आणि श्री महालक्ष्मी या देवीच्या तारक रूपाची



उपासना आपण प्रत्येक जण करत आपापल्या परीने करत असतो; मात्र आजमितीला देवीच्या ज्या रूपाच्या उपासनेची नितांत आवश्यकता आहे त्या भक्तांच्या उद्धारासाठी दृष्टांचा संहार करणाऱ्या महाकालीची उपासना महिलावर्ग केव्हा करणार आहे ? सध्याची देशाची आणि समाजाची स्थिती पाहता कोणत्याच क्षेत्रात आज महिला सुरक्षित नाहीत. स्त्री अत्याचारांच्या घटनांमध्ये वर्षागणिक कमालीची वाढ होऊ लागली आहे. शहर असो वा खेडे, गरीब असो वा श्रीमंत, शाळकरी कन्या असो वा वयोवृद्धा वासनांधांच्या विखारी नजरांपासून आज कोणीच सुरक्षित नाहीत, दर मिनिटागणिक देशात कुठल्या ना कुठल्या ठिकाणची स्त्री आज अत्याचाराला बळी पडू लागली आहे. स्त्री अत्याचारावर अंकुश आणण्यासाठी कठोर कायदे करूनही या घटनांमध्ये घट झालेली नाही. ज्या महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांनी परस्त्रीला मातेसमान मानण्याची शिकवण दिली त्याच छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात स्त्रीची होत असलेली अवहेलना लज्जास्पद आहे. पोलीस प्रशासन असो वा नातेवाईक सर्वच ठिकाणी स्त्रियांच्या मदतीला धावून येऊ शकत नाहीत त्यासाठी स्त्रियांनी स्वतःचे रक्षण स्वतः करण्यासाठी सिद्ध व्हायला हवे. प्रतिकूल प्रसंग केव्हा येईल ही वेळ कधी सांगून येत नाही त्यासाठी आपले मन आणि शरीर सततच प्रतिकारक्षम ठेवण्याची गरज आहे आणि त्याकरिता प्रत्येक स्त्रीने स्वतःचे रक्षण स्वतः करण्याची कला अवगत करून घ्यायला हवी. स्वसंरक्षणाचे किमान प्रशिक्षण प्रत्येकीने आजच्या काळात घ्यायलाच हवे.

देवीच्या काली स्वरूपात तिच्या प्रत्येक हातात शस्त्र आहे. या शस्त्रांचा वापर करून तिने सजन्नांचे रक्षण आणि दृष्टांचा संहार केला आहे. देवीच्या या रूपाची उपासना आज प्रत्येकी स्त्रीने करायला हवी. राणी लक्ष्मीबाई, राजमाता जिजाऊ, राणी चेन्नमा यांनी आपल्या राज्याच्या रक्षणासाठी प्रसंगी शस्त्र हाती घेऊन पराक्रम गाजवला आहे, पराक्रमी स्त्रियांची अशी अनेक उदाहरणे इतिहासात घडून गेली आहेत. या प्रत्येकीने शस्त्रांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतलेले होते, त्यांच्यामध्ये अफाट मनोधर्य होते. समाजात माजलेल्या वासनांध शक्तींचा संहार करण्यासाठी आता स्त्रियांनी सज्ज हायला हवे. लाठीकाठी, ज्युडो काराटे आदींचे अद्यावत प्रशिक्षण घेऊन दृष्ट शक्तींवर प्रहार करण्यासाठी सज्ज व्हायला हवे. स्त्रीची अबला ही ओळख पुसून ती प्रसंगी सबला होऊन रणरागिणीही होऊ शकते हे समाजाला दाखवून देण्याची वेळ आली आहे. विद्येची देवता श्री सरस्वती, धनाची देवता श्री महालक्ष्मी यांसोबत या नवीन वर्षात शक्तीची देवता श्री महाकाली मातेची उपासना करण्याचा संकल्प करूया. जेणेकरून २०२४ च्या अखेरीस राज्यातील स्त्री अत्याचाराचा आलेख उतरलेला असेल.

**सौ. मोक्षदा घाणेकर**
**काळाचौकी, मुंबई**

# आनंदजी 'ॲडम पीक'चा यात्रेकरू

आधुनिक केसरी

**जगप्रसिद्ध बौद्ध धम्मगुरू डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांनी श्रीलंकेच्या वास्तव्यात 'ॲडम पीक' अर्थात श्रीपाद पर्वताची धम्मयात्रा केली होती. आनंदजींच्या जीवन प्रवासातील ती अविस्मरणीय यात्रा होती. आज, ५ जानेवारी आनंद कौसल्यायन यांची जयंती त्यानिमित्ताने... बौद्ध धम्माच्या प्रचार-प्रसारात डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांचे अतुलनीय योगदान राहिले आहे. निष्ठावान बौद्ध धम्मगुरू म्हणून त्यांची विशेष ओळख आहे. बुद्ध धम्म- संघ हे अनमोल त्रिरत्न त्यांच्या जीवनाचे अलंकार होते. धम्मप्रचारार्थ त्यांनी देश-विदेशाची यात्रा केली होती. श्रीलंकेत त्यांचे पाच वर्षे वास्तव्य होते.**

या वास्तव्य काळात आनंदजींनी निसर्गरम्य श्रीपाद पर्वतराजीची चार वेळा धम्मयात्रा केली होती. आकाशातील तेजोमय चांदण्यांच्या धवल प्रकाशात या पर्वताच्या मनमोहक सौंदर्याची अनुभूती घ्यावी अशी आनंदजींची इच्छा होती. आनंदजींनी २५ मार्च १९३२ रोजी पहिली यात्रा रात्री एक वाजता आरंभ करून आपली मनोकामना पूर्ण केली. त्यावेळी ते अवघे सत्तावीस वर्षाचे होते. या यात्रेप्रसंगी महापंडित राहुल सांकृत्यायन त्यांच्यासोबत होते. या धम्मयात्रेचे मार्मिक वर्णन आनंदजींनी आपल्या 'तथागत का शाश्वत संदेश' या ग्रंथात लिहून ठेवले आहे. पर्वतावरून दिसणारा सूर्योदयाचा विहंगम देखावा श्रीपादचे सर्वात मोठे आकर्षण आहे. सात-आठ हजार फूट उंच चढाई करण्याची जी विशेषता आहे ती अत्यंत दर्शनीय व धाडसी आहे. तीन मैलांचा हा प्रवास असला तरी अत्यंत कठीण आहे. मुंगीच्या पावलाने चढणे - चालणे याशिवाय दुसरा मार्ग नाही. प्रत्येक अर्ध्या मैलावर, प्रत्येक अर्ध्या फर्लांगावर यात्रेकरूंसाठी सोयीसुविधा आहेत. शिखरावर अप्रतिम बुद्ध विहार



असून लाल रंगाची बुद्ध प्रतिमा महापरिनिर्वाण मुद्रेत पहुडली आहे. या विहारात भिक्खू निवास करतात. इतक्या उंच शिखरावर राहणारे भिक्खू बौद्ध उपासकांचे परम श्रद्धास्थान आहेत. श्रीपाद पर्वतावर चरणचिन्ह अंकुरित आहेत. त्यामुळे वेगवेगळे धर्म आपआपल्या शिकवणुकीनुसार, मान्यतेनुसार या पावन चरणचिन्हांची पूजा-अर्चना करतात. 'बुद्धाचे चरणचिन्ह' अशी बौद्ध जगताची श्रद्धा आहे. त्यांची निष्ठा, भक्ती आहे की तथागत बुद्ध तिसऱ्यांदा श्रीलंकेला आले असता त्यांच्या चरणकमळा पर्वत पावन झाला, धन्य झाला. चरणकमळाने स्पर्शच नव्हे तर अंकित झाला त्यामुळे हा 'श्रीपाद' आहे. त्यामुळे श्रीपाद हे केवळ बौद्धधर्मीयांचेच नव्हे तर सर्वधर्मीयांच्या प्रेरणेचे, आस्थेचे प्रतीक बनले आहे. बाराव्या शतकात सिंहल नरेश निस्संक मल्लने श्रीपादची यात्रा केली होती. त्याने रोवलेला शिलालेख आजही डौलाने उभा आहे. बुद्धधम्मात तथागतांच्या पदकमलांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. जेव्हा बुद्धमूर्ती अस्तित्वात नव्हती तेव्हा उपासक पदकमलांची, धम्मचक्राची विधीवत पूजाअर्चा करायचे. तथागतांच्या पदकमलांना 'बुद्धपद' म्हणतात. या पदचिन्हांना धम्मचक्र प्रवर्तनाचे प्रतीकही समजले जाते. आनंदजींनी श्रीपादची चौथी यात्रा १९६४ साली केली तेव्हा त्यांचेसोबत पूज्य भदन्त मेधंकर आणि तीन- चार श्रमण विद्यार्थी होते. सोबत विद्यालंकार महाविद्यालयाचा एक संस्कृत विद्यार्थी भिक्खू राहुलही त्यांच्या सोबतीला होता. आनंदजी म्हणतात, 'श्रीपादवर चढाई करताना रातकिड्यांची मंजुळ ध्वनी आमचा उत्साह करणारा होता. पर्वतावरून उतरणारा एक जण गुणगुणत होता, 'अपे बुटुं अपि वैन्दा' अर्थात आपल्या बुद्धाला आम्ही अभिवादन केले. दुसरा म्हणाला, 'अपे बुदुं अपि वैदंगन गमट यण्ड यनु ओ ओ ओ' अर्थात बुद्धाला अभिवादन करून आम्ही गावाला परत जात आहोत. शिखर चढता चढता सूर्योदयाची वेळ झाली होती. त्यावेळी आनंदजी आणि त्यांच्या निष्ठावान अनुचरांनी पर्वतावरून सर्व जगाला प्रकाशमान करणाऱ्या त्या तेजोनिधीचे दर्शन घेतले. अनेक शतकांपासून दरवर्षी लोक श्रीपादची यात्रा करतात. श्रीपादला मनोभावे वंदन करून आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. '

**मिलिंद मानकर,**
**मो. ८१७७८६६३९७**

# सरोगसीवर भाष्य करणार 'डिलिव्हरी बॉय'

आधुनिक केसरी

**'डिलिव्हरी बॉय' या चित्रपटाच्या घोषणेपासूनच प्रेक्षकांना या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांना उत्सुकता लागून राहिली होती. त्यात काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचे एक भन्नाट पोस्टर सोशल मीडियावर झळकले आणि आता प्रेक्षकांची उत्कंठा वाढवणारे एक धमाकेदार टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे.**

टीझरमध्ये प्रथमेश परब आणि पृथ्वीक प्रताप गावातील काही महिलांना 'सरोगसी'साठी तयार करताना दिसत असून यातून होणारा कल्लोळ आपल्याला चित्रपटात दिसणार आहे. आता हे दोघे गावातील महिलांना सरोगसीसाठी का तयार करत आहेत, याचे उत्तर मात्र प्रेक्षकांना लवकरच मिळणार आहे. या चित्रपटात प्रथमेश आणि पृथ्वीक बरोबर अंकिता लांडेही पाटीलही प्रमुख भूमिकेत आहे. 'डिलिव्हरी बॉय'मधून प्रथमेश परब एका वेगळ्याच लूकमध्ये प्रेक्षकांसमोर येणार असून त्याचा हा नवा अंदाज चाहत्यांना नक्कीच आवडेल.
हा चित्रपट सरोगसीवर भाष्य करणारा आहे, हे टीझरवरून कळतच आहे. आता हा नाद खुळा भाऊ आणि त्याचा जोडीदार गावातील महिलांना सरोगसीसाठी तयार करतो की आणखी अडचणी मागे लावून घेतो, हे बघताना प्रेक्षकांना धमाल येणार हे नक्की ! सिनेपोलिस आणि दीपा नायक प्रस्तुत, लुसिया एंटरटेनमेंट प्रोडक्शन्स निर्मित 'डिलिव्हरी बॉय' या चित्रपटाचे डेव्हिड नादर निर्माते आहेत तर फेलिक्स नादर, विकास श्रीवास्तव, विकास सिंग, राझ धाकड आणि ऋषिकेश पांडे सहनिर्माते आहेत. मोहसीन खान दिग्दर्शित या चित्रपटाचे




लेखन राम खाटमोडे आणि विनोद वणवे यांनी केले आहे. मनोरंजनाची हमी देणारा हा चित्रपट येत्या ९ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. याबद्दल दिग्दर्शक मोहसीन खान म्हणतात, " एका संवेदनशील विषयवार या चित्रपटात भाष्य करण्यात आले आहे.चित्रपट विनोदी जरी असला तरी या नाजूक विषयांचे गांभीर्य आम्ही तितकेच जपले आहे. विनोदाच्या माध्यमातून एक सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ही नात्यांची गोष्ट आहे. जी प्रत्येकाने आपल्या कुटुंबासोबत पाहावी अशी आहे. आपल्या समाजात हा विषय तितकासा उघडपणे, सहजपणे बोलला जात नाही. त्यामुळे हा विषय घराघरात पोहोचावा, त्याचे महत्व पटावे, याकरता आम्ही हा चित्रपट अगदी मनोरंजनात्मकरित्या प्रेक्षकांसाठी आणला आहे. तर निर्माते डेव्हिड नादर म्हणतात, " एक धमाल चित्रपट आम्ही प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहोत. प्रेक्षकांना आपल्या आसपासचे विषय पडद्यावर बघायला जास्त आवडतात. या चित्रपटात मनोरंजन आहे, विनोद आहेत, समाज प्रबोधन आहे आणि याच गोष्टी प्रेक्षकांना विशेष भावणाऱ्या आहेत. चित्रपटाचा विषय जरा वेगळा आहे. 'डिलिव्हरी बॉय'चे सादरीकरण वेगळे आहे आणि माझ्या मते हीच या चित्रपटाची खासियत आहे.



# ज्ञानज्योती सावित्रीबाई आणि देवी सरस्वती



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

आधुनिक केसरी

**भारतात मुलींची पहिली शाळा सुरु करणाऱ्या शिक्षणतज्ञ, समाज सुधारक आणि कवयित्री सावित्रीबाई फुले यांची जयंती नुकतीच पार पडली. सावित्रीबाईंना स्त्रीवादाची जननी असेही म्हटले जाते. स्त्री आणि पुरुष यांच्या अधिकारांतील दरी मिटविण्याचे महत्कार्य त्याकाळी सावित्रीबाईंनी केले. स्त्रियांच्या अधिकारासाठी लढताना तत्कालीन समाजाकडून झालेला रोषही त्यांना सहन करावा लागला. स्त्री शिक्षणाला होत असलेला विरोध झुगारून सावित्रीबाईंनी स्वतः शिक्षण घेतले, शाळेत शिक्षिका म्हणून नोकरी करून त्या मुख्याध्यापिका झाल्या.**

मुलींना शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यासाठी १ जानेवारी १८४८ मध्ये पुण्यातील भीडेवाड्यात सावित्रीबाईंनी मुलींची पहिली शाळा सुरु केली, पुढील ४ वर्षांत त्यांनी १८ शाळा उघडल्या. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या महान योगदानाचे स्मरण म्हणून २०१५ मध्ये पुणे विद्यापीठाचे नामकरण 'सावित्रीबाई फुले विद्यापीठ' असे करण्यात आले. ३ जानेवारी हा त्यांचा जन्मदिन देशभरात बालिका दिन म्हणूनही साजरा केला जातो. शिक्षणक्षेत्रातील त्यातही स्त्री शिक्षणातील त्यांचे अमूल्य योगदान हा देश कधीही विसरणार नाही.

३ जानेवारीला सावित्रीबाई यांची जयंती देशभरात साजरी झाली. यानिमित्ताने अनेक ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सावित्रीबाई यांची जयंती जवळ आली की काही समाजविघातक मंडळींकडून समाजात विष पेरण्याचे काम चालू होते, ज्यामध्ये काही राजकीय मंडळीही आघाडीवर असतात. सावित्रीबाई यांचे गुणगान गाताना ही मंडळी जाणीवपूर्वक देवी सरस्वतीवर अश्लाघ्य भाषेत टीका टिपणी करतात, समस्त शाळांतून देवी सरस्वतीची चित्रे आणि मुर्त्या काढून त्या ठिकाणी सावित्रीबाई फुले यांची छायाचित्रे आणि मुर्त्या लावण्याची भाषा केली जाते. या मंडळींचा ब्राह्मण समाजाबद्दल असलेला आकस असा देवी देवतांवर काढला जात असल्याचे पाहिल्यावर यांच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते. 'देवी सरस्वतीचे शिक्षणक्षेत्रातील योगदान काय आहे ?' 'स्त्री शिक्षणासाठी त्यांनी काय केले ?' येथपासून तर काही महाभाग देवी सरस्वतीचे चारित्र्यहनन करण्याचाही यानिमित्ताने प्रयत्न करतात. राष्ट्रीय जनता दलाचे आमदार फतेह बहादूर कुशवाह यांनी नुकतेच 'देवी सरस्वती चारित्र्यहीन असल्याने तिची पूजा करू नये' असे फुत्कार काढून हिंदूंना डिवचण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. यापूर्वीही कुशवाह यांनी देवी दुर्गा काल्पनिक असल्याचे विधान करून हिंदूंचा रोष ओढवून घेतला होता. सावित्रीबाईंचे गुणगान गाताना हिंदू धर्मातील देवी देवतांविषयी प्रकट केला जात असलेला रोष पाहिल्यावर या मंडळींनी सावित्रीबाई खरंच अभ्यासल्या आहेत का असा प्रश्न पडतो.



हिंदू धर्मात देवी सरस्वतींना विद्या आणि कला यांची देवता मानले जाते. तिच्या भावपूर्ण उपासनेने उपासकाची बुद्धी सात्त्विक बनल्याने त्याला विविध प्रकारच्या कला आणि ज्ञान प्राप्त होते. बुद्धीने जे ग्रहण केले ते शब्दबद्ध करण्याचे काम देवी सरस्वतीचे आहे. देवी सरस्वतींना संत ज्ञानेश्वरांनी 'अभिनव वाग्विलासिनी' तर श्री समर्थ रामदासस्वामी यांनी 'शब्द मूळ वाग्देवता' असे म्हटले आहे. ही विद्येची देवता आहे. श्री सरस्वती देवीला शारदाही म्हटले जाते. कुठल्याही कलेची उपासना आरंभ करताना श्री गणेश आवाहनानंतर देवी सरस्वतींचेही आवाहन केले जाते.

शाळांमध्ये 'या कुंदेंदु तुषार हार धवला....' या श्लोकाने देवी सरस्वतीचे आवाहन केले जाते. विजया दशमीच्या दिवशी पाटीवर श्री सरस्वतीचे प्रतीकात्मक चित्र काढून वह्या पुस्तके पुजण्याची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून अविरत सुरु आहे.

शाळांना विद्यामंदिर म्हणजेच देवी सरस्वतीचे मंदिर असेही म्हटले जाते. इतिहासतज्ञ पार्थ बावसकर यांनी सखोल अभ्यास केल्यावर त्यांच्या लक्षात आले की स्वतः सावित्रीबाई सरस्वतीदेवींना आदरस्थानी मानत होत्या. सावित्रीबाईंनी आपल्या 'काव्यफुले' या काव्यसंग्रहात शाळेचा उल्लेख देवी सरस्वतीचा दरबार असा केला आहे. या काव्यसंग्रहातील खालील कवितेत हा उल्लेख स्पष्ट आढळतो.

**सरस्वतीचा दरबार खुला जाहला पाहू चला शाळेमधुनी शिकूनी घेऊ ज्ञान मिळवू चला ग चला सरस्वतीच्या या दरबारात शिक्षण घेणे जाऊ चला विद्यादेवीस प्रसन्न करुनी वर मागू तिजला चला** स्वतः सावित्रीबाईंनी आपल्या काव्यात देवी सरस्वतीचा उल्लेख 'विद्येची देवता' असा करून देवी सरस्वतीवर टीका करून आपल्या अल्प बुद्धीच्या परिचय करून देणाऱ्यांची तोंडे शिवली आहेत. या चार ओळींतून विद्येच्या देवतेवरील त्यांची श्रद्धाही दिसून येते. सावित्रीबाई स्वतः आस्तिक असल्याचेही या काव्यसंग्रहाचे वाचन केल्यावर लक्षात येते. त्यामुळे सावित्रीबाईंच्या नावाने नास्तिकतावादाचा पुरस्कार करण्याचा, लोकांची माथी भडकावण्याचा, विद्यार्थ्यांची दिशाभूल करण्याचा जो प्रयत्न केला जात आहे तो आधी तो बंद करायला हवा. सावित्रीबाईंचे गुणगान गात असताना देवी सरस्वतींवर खालच्या स्तरावर होत असलेली टीका पाहिल्यावर आज सावित्रीबाई असत्या तर अशा टीकाकारांच्या कानशिलात दोन लगावल्यावाचून शांत राहिल्या नसत्या. सावित्रीबाईं फुलेंविषयी आज समस्त भारतीयांना आदर आणि अभिमान आहे, म्हणूनच आज प्रत्येक शाळेमध्ये सावित्रीबाई यांची तसबीर लावलेली दिसते. याचाअर्थ देवी सरस्वतीची तसबीर काढायला हवी असा होत नाही, हे टीकाकारांच्या लक्षात येईल का ?

# लोकांचे प्रश्न कसे सुटणार ? त्यांच्या अपेक्षापूर्तीचे काय ?

आधुनिक केसरी

**संसदेच्या सुरक्षाभंगाच्या प्रकरणावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या निवेदनासाठी गेल्या आठवड्यापासून विरोधक सभागृहामध्ये आक्रमक झाले होते. लोकसभा, राज्यसभा यांत गोंधळ घालणाऱ्या एकूण १४६ खासदारांना यंदाच्या हिवाळी अधिवेशनात निलंबित करण्यात आले. १३ डिसेंबर या दिवशी संसदेत जे झाले ते नक्कीच स्वीकार्य नाही. कोणीही सुज्ञ व्यक्ती त्याचा निषेधच करेल असे ते कृत्य होते. अर्थातच अशा अत्यंत संवेदनशील प्रकरणी तळागाळातून ठोस माहिती घेऊन निवेदन करण्यास निश्चितच काही कालावधी लागू शकतो. याविषयी दुमत नाही. या गुंतागुंतीच्या प्रकरणात आणखी कोण आहे**

? ते सांगत असलेली कारणे आणि सत्यता यांची शहानिशा करताना अन्वेषण यंत्रणांवर असणारा दबाव लक्षात घेतला पाहिजे. या अन्वेषणातून काय समोर येते ? याकडे भारतासह जगाचेही लक्ष आहे. अशा गोष्टी म्हणजे रिमोट कंट्रोलचे बटन दाबताच एखादी गोष्ट जशी लगेच चालू होते तसे नव्हे ना. केवळ आक्रमक होऊन काय उपयोग ? विरोधी आक्रमक होतात आणि गोंधळ घालून सभागृह डोक्यावर घेतात. त्याने मूळ प्रश्न सुटणार आहे का ? याचे उत्तर काय ? आम्ही शांत न राहता सरकारला धारेवर धरले असे जनतेला दाखवण्याचा आटापिटा उपयोगाचा नाही. प्रकरणाचे अन्वेषण करणारी यंत्रणा एका टोकाला आणि विरोधी एका टोकाला. अन्वेषण यंत्रणा अचूक माहिती सर्वांसमोर ठेवण्यासाठी जंगजंग पछाडत असणार, जीवाचे रान करून प्रचंड मेहनत करत असणार आणि विरोधी आक्रमक होऊन काय करणार ? यांच्या वागण्याचा, अन्वेषणाचा कुठेतरी काही ताळमेळ बसतो का ? लोकप्रतिनिधी म्हणून कसे वागले - बोलले पाहिजे ? याविषयी ठोस नियमावली करून त्याचे उल्लंघन करणाऱ्या लोकप्रतिनिधींवर कडक कारवाई झाली पाहिजे. लोकप्रतिनिधी आणि शिस्त असे समीकरण असले पाहिजे. अशी जनतेची कायमच मागणी राहिली आहे. महाराष्ट्र राज्याचे हिवाळी अधिवेशन चालू आहे, तर केंद्रातील अधिवेशनात गोंधळाचा कहर झाला. अधिवेशन चालवण्यासाठी प्रत्येक मिनिटाला खर्च येत असतो. त्याचे मोल जपले पाहिजे ते कधीच जपले जात नाही. आरडाओरडा करणे, कामकाजात अडथळा होईल असे वागणे हेच कायम चालत आले आहे. त्यामुळे अधिवेशन चालवण्यासाठी होणारा खर्च आणि त्याची फलनिष्पत्ती याविषयी कायम प्रश्नच असतो. लोकप्रतिनिधी मग ते सत्ताधारी पक्षाचे असो वा विरोधी पक्षाचे. आपले प्रश्न त्यांच्याकडून अधिवेशन काळात उपस्थित केले जातील आणि त्यावर ठोस उत्तर मिळून ते मार्गी लागतील अशी लोकांना अपेक्षा असते. पण कसल काय ? आरडाओरडा करून प्रश्न सुटले आहेत असे कधी झाले नाही. अमूक प्रश्नावर विरोधक आक्रमक झाले आणि त्यांनी घोषणाबाजी करण्यास आरंभ करत सभागृह दणाणून सोडले. असे वाचायला आणि पाहायला मिळते. यामुळे प्रश्न सुटला का ? तर नाही. तो आहे तसाच पडीक राहतो. मग आरडाओरडा आणि घोषणाबाजी कशाला ? आम्ही लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी कसे आक्रमक होतो ? हे दाखवण्यासाठी केलेला खटाटोप काही उपयोगाचा नाही. भारतीय जनता संयमीच म्हणावी लागेल. कारण लोकप्रतिनिधी गोंधळ घालतात, त्यामुळे अधिवेशनात वारंवार येणारा व्यत्यय लोकांचे प्रश्न मांडण्यात अडथळा ठरतो. मतदारसंघातील जनतेला वाटते आमचे खासदार आमचे प्रश्न उपस्थित करतील आणि त्यावर कृतिशील उत्तर मिळवतील. पण याविषयी उदासीनताच दिसते. तरीही लोक यांच्या विरुद्ध आक्रमक न होता. शांत राहणे आणि दैनंदिन कामकाज करणे चालू ठेवतात. लोकांच्या याच स्वभावाचा गैरफायदा उचलला गेला आहे. असे समजायचे का ? आपण गोंधळ घातला तरी लोकांना फरक पडत नाही. ते आपल जीवन जगत असतात. हे व्यवस्थित जाणले गेले आहे. वर्षानुवर्षे अधिवेशनांवर अधिवेशने होत आली आहेत. मात्र लोकप्रतिनिधींच्या वर्तनात - बोलण्यातही सुधारणा न होता, ते आहे तसेच पुढे पुढे सरकत राहिले आहे. त्यामुळे जे नवीन लोकप्रतिनिधी येत आहेत. त्यांच्याकडूनही आधीच्या तसेच विद्यमान लोकप्रतिनिधींप्रमाणेच वागले जात आहे. यालाच आदर्श नमुना मानले जात आहे असे दिसते. कारण त्यात कुठेही सकारात्मक पालट झाल्याचे दिसत नाही. अधिवेशन म्हणजे विरोधकांचा गोंधळ, जे सरकार सत्तेत असेल त्यांच्याकडून नियोजित सूत्रांनुसार अधिवेशन चालवण्याचा प्रयत्न होणे आणि ते विरोधी मंडळींना मान्य नसते. हेच लोकांना पाहायला मिळते. असेच करायचे आहे तर करोडो रुपयांचा चुराडा करून अधिवेशनांचे आयोजन तरी कशासाठी करायचे ? असा संतप्त प्रश्न लोकांच्या मनात खदखदत असतो. त्याचेही कोणी उत्तर देत नाही. अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्याची संधी मिळाल्यावर प्रश्नाशी निगडित मूळ विषयाला बगल देत तो विषय दुसरीकडे नेला जातो. त्यामुळे प्रश्न उपस्थित करण्याची संधी मिळूनही ती वाया घालवली जाते. राजकारणात काही लोप्रतिनिधींनीची जीभ वरचेवर घसरत असते आणि त्याचा त्यांना फटकाही बसतो. मात्र आपल्या या सवयीत बदल करतील ते असंयमी नेते कुठले ? कधी जाहीर सभांत जमा झालेल्या गर्दी समोर वाचाळपणे बोलतात तर कधी पत्रकार परिषदेत पत्रकारांवरच ओरडण्याचे काम करतात. यावर कडी म्हणजे अधिवेशनामध्ये बोलतानाही अभ्यासपूर्णपणे विषय मांडत नाहीत. आणि वर अभिमानाने म्हणतात मी असा फटकळ, रोखठोक स्वभावाचा माणूस आहे. जे पोटात तेच ओठात वगैरे दाखवण्याचा त्यांचा असलेला स्वभाव बऱ्याच प्रसंगी अशा लोकांच्याच अंगलट येतो आणि त्याचे रुपांतर यांना अधिवेशनातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात होते. मूल शाळेत जाते. पण त्याने बेशिस्तपणा केल्यावर शिक्षक त्याला शिक्षा करतात. उदा. तास संपेपर्यंत वर्गाबाहेर उभे करतात, ओणवे उभे राहण्यास सांगतात. यांना शिक्षा केल्याने यांचा त्यावेळचा अभ्यास बुडतो. पण बुडालेला अभ्यास इतरांकडून समजून घेण्यातही रस दाखवला जात नाही. मात्र यांना वेळीच बाहेर केल्याने वर्गातील इतर विद्यार्थ्यांची शैक्षणिक हानी होत नाही. यावरून राजकीय निलंबनाविषयीही काय ते लक्षात घेता येईल. सरसकट सर्वच नेते उतावीळपणे विधाने करतात, बेशिस्तपणा करतात असे नाही. तर काही नेते अभ्यासपूर्ण, संयमी वक्तृत्व यांसाठी प्रसिद्ध असतात. अशा नेत्यांकडून उतावीळपणे विधाने करणाऱ्या नेत्यांनी त्यांचे गुण आत्मसात केले पाहिजे. माझा स्वभावच रोखठोक आहे. हे सूत्र सार्वजनिक जीवनात वावरताना उपयोगी नाही. अशा स्वभावाची व्यक्ती स्वतःचेच म्हणणे खरे करण्यासाठी वाटेल ते करण्याची सिद्धता ठेवतात. मात्र सहसा माघार घेत नाहीत. पण हाताची पाचही बोटे जशी सारखी नसतात. तसे परिस्थितीसुद्धा कायम आपल्यासाठी अनुकूल असते असे अजिबात नाही. शेरास सव्वाशेर भेटतोच असे म्हटले जाते. तसे झाले की तोंडावर आपटले जाते. अधिवेशनाचे गांभीर्य लक्षात घेतले जात नाही. किंबहुना त्या विषयाला महत्त्व दिले जाते का ? हा प्रश्न आहे. कारण तसे असते तर धिंगाणा सर्व प्रथम बंद झाला असता. जो बंद होण्याची कसलीच चिन्हे नाहीत. उलटपक्षी तो केल्याने बघा आमचा कसा आवाज दाबला गेला आणि आम्हाला निलंबित करण्यात आले असे म्हणत लोकांची सहानुभूती मिळवली जाते. पण लोक यांच्याही अनेक पावले पुढे आहेत. हे ते विसरतात. लोकांना गोंधळ नको तर चिंतन करून बोलणारे आणि पैशांचा चुराडा होऊ न देणारे लोकप्रतिनिधी हवे आहेत. स्वतःच स्वतःच्या अडचणी वाढवून इतरांना दोष देण्यात काहीच तथ्य नाही. यालाच तर 'गिरे फिर भी टांग उपर' असे म्हणतात. सत्ता येते आणि जाते. असे म्हटले जाते. पण जिथे सत्ताधारी चुकत असतात. तीच संधी साधून प्रचंड आक्रमकता दाखवली जाते. ना सत्ताधीश ना विरोधी पक्ष. कोणाचीही बाजू घ्यावी असे कोणीही लाडके नाही. कारण आज जे सत्तेत आहेत. ते विरोधी बाकांवर असताना गोंधळाच्या संदर्भात त्यांनीही काही वेगळे केलेले नव्हते. याची व्यवस्थित कल्पना भारतीय लोकशाहीला आहे. भारतीय राज्य घटनेने प्रत्येक भारतीय नागरिकाच्या वैचारिक स्वातंत्र्याचा आदरच केला आहे. भारता इतके वैचारिक स्वातंत्र्य जगात कुठल्या देशात आहे असे वाटत नाही. वैचारिक स्वातंत्र्याचा दाखला देताना स्वयंशिस्त अत्यंत महत्त्वाची आहे, याचा सोयीस्कर विसर कसा काय पडतो ? आणि स्वयंशिस्त अंगी यावी यासाठी काय प्रयत्न करतो ? त्याचे चिंतन आवश्यक आहे.

जयेश राणे
मुंबई.

# आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आज जयंती. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म ६ जानेवारी १८१२ रोजी पोंभुरले येथे झाला. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या जन्मदिनीच म्हणजे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे महाराष्ट्रातील पहिले वृत्तपत्र सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे लहानपणापासून हुशार होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी मराठी आणि संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते मुंबईला गेला तिथे त्यांनी इंग्रजी विषयाचे शिक्षण पूर्ण केले.**



इंग्रजी विषयात देखील त्यांनी नैपुण्य मिळवले. इंग्रजीतील त्यांचे नैपुण्य पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. त्या कॉलेजमध्ये एकूण सतरा प्राध्यापक होते त्यात बाळशास्त्री जांभेकर हे एकमेव मराठी प्राध्यापक होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचेच विद्यार्थी होते. पुढे त्यांची नेमणूक शाळा तपासणीस म्हणून झाली. बोर्ड ऑफ एज्युकेशनने चांगले अध्यापक तयार करावेत अशी सूचना त्यांनी इंग्रज सरकारला केली ती सूचना मान्य करून इंग्रज सरकारने डीएड, बीएड कॉलेजची निर्मिती केली. ते शिक्षणाबाबत जितके आग्रही होते तितकेच ते सामाजिक सुधारणे बाबत आग्रही होते. केवळ शिक्षणाचा प्रसार करून चालणार नाही तर सनातनी आणि प्रतिगामी लोकांच्या मनावर बेगडी श्रद्धांचा जो कालबाह्य पगडा आहे तो हटवला पाहिजे. लोकांच्या भावना, संवेदना विशाल उदार झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते त्याकरिता त्यांनी दर्पण नावाचे पहिले वर्तमानपत्र सुरू केले.




दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. दर्पण हे द्विभाषिक वर्तमानपत्र होते. एकाच वेळी इंगजी व मराठीत निघणाऱ्या या वर्तमानपत्राच्या पानातील दोन स्तंभात डावीकडचा स्तंभ इंग्रजी भाषेत तर उजवीकडच्या स्तंभात मराठी भाषांतर असे त्यात एकूण आठ पाने असत. जांभेकर यांनी वाचकांची मागणी वाढू लागल्याने दर्पण साप्ताहिक ४ मे १८३२ पासून सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे निर्भीड पत्रकार होते. त्यांचे लेख विचारप्रवर्तक असत. इंग्रजांच्या नोकरीत असूनही ते इंग्रज सरकार विरुद्ध बेधडक लिहायचे त्याचप्रमाणे जातपात, कर्मकांड, अनिष्ट रूढी परंपरा यावर ते आपल्या लेखणीतून सातत्याने प्रहार करीत. ६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस आणि योगायोगाने ६ जानेवारी रोजीच दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला असल्यामुळे हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना विविध संस्थांकडून गौरविले जाते. त्यांचा सन्मान केला जातो. १८ मे १८४६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे निधन झाले. जयंतीदिनी बाळशास्त्री जांभेकरांना विनम्र अभिवादन! तसेच पत्रकार दिनाच्या सर्व पत्रकार बंधूंना मनापासून शुभेच्छा!

# पत्रकारिता ही भारतीय लोकशाहीची ढाल




रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**पत्रकारिता ही कोहीनूर हिऱ्यापेक्षाही मौल्यवान आणि तलवारी पेक्षाही तीक्ष्ण धारधार मानल्या जाते आणि आहे. त्याचप्रमाणे पत्रकारिता ही जगाचा तिसऱ्या डोळ्याची भुमिका बजावीत असते. पत्रकारिता समाज घडविण्याचे व राष्ट्रहीत जपण्याचे मोठे साधन आहे. महाराष्ट्रात दरवर्षी 6 जानेवारीला पत्रकार दिवस साजरा केला जातो.हा दिवस आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ साजरा केल्या जाते.बाळशास्त्री जांभेकरांना मराठी भाषेतील पत्रकारिता सुरू केल्यामुळे "द फादर ऑफ मराठी जर्नलिज्म" या रूपाने सुध्दा ओळखले जाते.**

म्हणुनच महाराष्ट्र सरकारने पत्रकार दिवस 6 जानेवारी या दिवशी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त घोषित केला आहे.त्यामुळे महाराष्ट्र राज्यात 6 जानेवारी हा मराठी पत्रकार दिवस म्हणुन साजरा केला जातो.जांभेकरांचे काही तत्व होते सत्तेच्या विरोधात लीखान करने.कारण हे लीखाण सत्तेच्या विरोधात नसुन सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय.जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहिणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी लक्षात येणार नाही.त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे.म्हणनु जांभेकर म्हणतात सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांचे कौतुक नव्हे,उलट शिव्या घातल्या तर खऱ्या पत्रकारितेची पावती मीळते असे ते मानीत. भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला "चौथास्तंभ" ही उपमा दिली आहे. जागतिक हालचाली, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय, राजकीय हालचाली, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण माहिती 140 कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.प्रत्येक वर्षी 6 जानेवारीला महाराष्ट्रात पत्रकार दिवस साजरा केला जातो.1920 मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दार्शनिक जॉन डेवी यांनी लोकतान्त्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते. पत्रकारिता जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते. या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने पारपाडतो.प्रत्येक बाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते. पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने, कॅमेरात कैद करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचवीने.आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन,वेब-पत्रकारिता, मिडिया, फेसबुक, सोशल मीडिया,ई-पत्रकारिता यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वतःच्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते यालाच म्हणतात "चौथास्तंभ".पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात "पत्रकारितेची शैली". पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून तिक्ष्ण( धारधार ) लीखाण केल्या जाते.यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात.पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर फीक्की पडतांना दिसून येते. कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर असते व ती लेखणीतून निर्माण होत असते.आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ,ग्रह-तारे यातील घडामोडी जनतेला कळुन येतात. आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी आपण पहात असतो.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते.त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असतो.तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो.वर्तमानपत्राला




सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात.यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे.आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट व नदीपेक्षा सोज्वळ निर्मळ असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी 6 जानेवारी 1832 रोजी "दर्पण" नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीस या भाषांचे ज्ञान होते.मराठी व संस्कृतमध्ये निष्णात झाल्याने बाळबोध,गीतपाठ, वेदपठण, अमरकोश, लघुकौमुदी व पंचमहाकाव्य या संस्कृत ग्रंथांचा दांडगा अभ्यास होता.1832 साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे "दर्पण" हे मराठीतील "पहिले वृत्तपत्र"होय.त्यावेळी इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्या यासाठी "दर्पण"मध्ये एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात असे. यानंतर राजा राममोहन रॉय यांचा "संवाद कौमुदी"टिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' ही सर्व वृत्तपत्रे "आर्थीक तोटा" सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविल्या जात होती. पत्रकारीतेतील तीक्ष्ण( धारधार ) लेखणीमुळे भारत स्वतंत्र करण्यास मोठी भूमिका होती.त्यामुळे इंग्रजांना भारत सोडून जावे लागले व 15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुरदर्शन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे.टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता.परंतु सरकारने टिआरपी घोटाळा उघडकीस आणुन पत्रकारिता व चौथास्तंभ यांच्यावर थोडीशीही ईजा येवु दिली नाही. 6 जानेवारी पत्रकार दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेण्याची गरज आहे. देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे. कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते व समाज निर्माण होतो. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना उन, पाउस, थंडी, वादळ, सुनामी यासारख्या असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते याचा मी जाहीर निषेध करतो. अशा असामाजिक तत्वांना केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. 6 जानेवारी पत्रकारिता व दर्पण दिनाला शत-शत प्रणाम.

# पत्रकारितेतील-दीपस्तंभ; बाळशास्त्री जांभेकर



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९९७

आधुनिक केसरी

**वृत्तपत्रांचा इतिहास हा चळवळींचा इतिहास असतो. वृत्तपत्रे सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेला गती देतात. त्याद्वारे लोकांना सामाजिक संकेत, कार्यात्मक भूमिका आणि मूल्य याबाबतचे शिक्षण दिले जाते आणि याच विचारातून जवळपास 183 वर्षापूर्वी म्हणजे 6 जानेवारी 1832 रोजी आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू केले. मराठीतील पहिले संपादक होण्याचा बहुमान मिळविला. त्यांची आठवण म्हणून आपण ६ जानेवारी रोजी महाराष्ट्रात "दर्पण दिन" साजरा करतो.सहा जानेवारी १८१२हा त्यांचा जन्म दिवस. त्याकाळी समाजास प्रबोधनाची मोठी गरज होती.**

इंग्रजांच्या हातात आपला देश असताना आपल्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करुन परिस्थितीची जाणीव करुन देण्यासाठी एखादे वृत्तपत्र असावे असे बाळ शास्त्रींना वाटले. त्यामुळे इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेत 'दर्पण'ची सुरूवात मुंबई येथे केली. त्याकाळी सुरु झालेल्या मुद्रणालयाचा त्यांनी समाज प्रबोधनासाठी उपयोग करुन घेतला.25 जून 1840 साली दर्पणचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. दर्पणच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण, मनोरंजन आणि समाजप्रबोधनाचा हेतू साध्य केला. 'दर्पण' मध्ये एकही जाहिरात त्यांनी छापली नाही. अगदी स्वतःचे पैसे टाकून जवळपास आठ वर्षे लोकांसाठी वृत्तपत्र सुरु ठेवले. यावरुनच आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचा वृत्तपत्र सुरू करण्यामागील हेतू आणि तळमळ स्पष्ट होते. त्यावेळी गव्हर्नर जेम्स कार्नाक यांनी जस्टीस ऑफ पीस असा किताब देऊन बाळशास्त्रींचा गौरव केला. वडील गंगाधरशास्त्री हे पंडित तर आई सगुणाबाई धार्मिक. त्यांचाच वारसा बाळशास्त्रींना मिळाला. कोकणांतील पोंभुर्ले या गावी जन्म आणि तद्नंतर मुंबईतील वास्तव्य, शिक्षण, शिक्षणातील अडीअडचणीवर मात केली.. बराच खडतर प्रवास बाळशास्त्री यांनी केला. 1824 च्या सुमारास पोंभुर्ले सोडून बाळशास्त्री मुंबईत आले. इंग्रजी भाषेचा सखोल अभ्यास करुन विविध विषयांचे ज्ञान मिळवून त्याचा उपयोग आपल्या समाजाला कसा होईल याकडे त्यांचा ओढा होता. अगदी वयाच्या अकराव्या वर्षी संस्कृतचे शिक्षण पूर्ण करुन जांभेकरांनी मुंबई गाठली होती. इंग्रजीचे ज्ञान आत्मसात केले. तत्कालीन प्रमुख आठ भाषा व अनेक शास्त्रात ते पारंगत होते.त्यांची ग्रंथसंपदा पुष्कळ होती तसेच त्यांना अनेक सन्मान मिळाले होते. 1834 साली भारतातील पहिले प्राध्यापक होण्याचा बहुमान बाळशास्त्रींना मिळाला आणि 1845 साली ते राज्याच्या शिक्षण विभागाचे संचालक झाले. बाळशास्त्रींनी विविध विषयांवर ग्रंथ लिहिले. आचार्य बाळशास्त्री जांभेकरांबद्दल न्यायमूर्ती ना.ग.चंदावरकर यांनी म्हटले आहे की, "बाळशास्त्री अव्वल इंग्रजी अंमलातील एक थोर विद्वान तसेच ज्ञानाच्या विविध क्षेत्रात लिलया संचार करणारे पंडित होते. आचार्य अत्रे यांनी बाळशास्त्री जांभेकरांबद्दल खूपच महत्त्वपूर्ण अशी टिपणी केली आहे. ते लिहितात की, बाळशास्त्री जांभेकर हे बोलके नव्हे तर कर्ते सुधारक होते. केवळ प्राध्यापक म्हणून अध्ययनच न करता बाळशास्त्रींनी आपल्या दर्पण मधून सामाजिक सुधारणेवर भर दिला. दादाभाई नौरोजी हे आचार्य बाळशास्त्रींचे विद्यार्थी होते. बाळशास्त्री जांभेकर हे आद्य मराठी पत्रकार आणि आद्य समाजसुधारक होते. त्यांचे हे महान कार्य पुढील कित्येक पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरत आहे. समाजातील वर्ण व्यवस्था, जातीभेद, स्त्री दास्य, सती प्रथा, अस्पृश्यता, बालविवाह आदी जुन्या मूल्यांचा पुनर्विचार करण्यास पंडितांना भाग पाडले. समाजातील भेदाभेद गेले पाहिजेत, याची त्यांना जाणीव झाली. हळूहळू समाज प्रबोधनाची प्रक्रिया सुरु झाली. यातच वृत्तपत्रांचे आगमन ही घटना क्रांतीकारक ठरली. एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेल्या जांभेकरांना आपण दर्पणकार म्हणूनच ओळखतो. ब्रिटिश कालखंडात त्यांनी दर्पणच्या संपादनाची धुरा समर्थपणे वाहिली.

भविष्यकाळातील माध्यमाची जबरदस्त ताकद त्यांनी तेव्हाच ओळखली होती. परकीय सत्तेला उलथून टाकायचे असेल तर समाजजागृती घडवायला हवी आणि त्यासाठी लेखणीला पर्याय नाही, हे त्यांना फार पूर्वीच समजले होते. वृत्तपत्राच्या संपादकाला आवश्यक असणारी भाषेची जाण आणि सामाजिकतेचे भान त्यांच्याकडे होते. आचार्य जांभेकर हे महाराष्ट्रातील पहिल्या पिढीतील समाजसुधारक होते. दर्पण हे बाळशास्त्रींच्या हातातील एक लोक शिक्षणाचे माध्यम होते. त्यांनी त्याचा उत्तम वापर प्रबोधनासाठी करून घेतला. यात विशेष उल्लेख त्यांनी हाताळलेल्या विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार. बाळशास्त्रींनी या विषयांवर विपुल लेखन केले. त्यामुळे त्यावर विचारमंथन होऊन त्याचे रूपांतर विधवा पुनर्विवाहाच्या चळवळीत झाले. ज्ञान, बौद्धिक विकास आणि विद्याभ्यास या गोष्टी त्यांना महत्त्वाच्या वाटत. उपयोजित ज्ञानाचा प्रसार समाजात व्हावा, ही त्यांची तळमळ होती. विज्ञाननिष्ठ मानव उभा करणे हे त्यांचे स्वप्न होते. सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व ओळखून त्यांनी बॉम्बे नेटिव्ह जनरल लायब्ररीची स्थापना केली. विविध समस्यांवर सकस चर्चा घडवण्यासाठी नेटिव्ह इंप्रुव्हमेंट सोसायटीची स्थापना केली. यातूनच पुढे स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी या संस्थेला प्रेरणा मिळाली व दादाभाई नौरोजी, भाऊ दाजी लाड यांसारखे दिग्गज कार्यरत झाले.1840 मध्येच त्यांनी "दिग्दर्शन" या मराठीतील पहिल्या मासिकाची सुरुवात केली. या मासिकाचे संपादक म्हणून त्यांनी पाच वर्षे काम पाहिले. या अभिनव माध्यमातून त्यांनी लोकांची आकलन क्षमता वाढवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विद्वत्तेला जोड होती ती बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची. संस्कृत, मराठी, इंग्रजी आणि हिंदी, व्यतिरिक्त आठ ते दहा भाषा त्यांना येत होत्या.या भाषांसह विज्ञान, गणित, भूगोल, शरीरशास्त्र व सामान्य ज्ञान या विषयांवरही त्यांचे प्रभुत्व होते. मराठीतील वृत्तपत्रांचे जनक असा त्यांचा नावलौकिक आहे. त्याचबरोबर रॉयल एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकात शोधनिबंध प्रसिद्ध झालेले पहिले भारतीय असाही मान त्यांच्याकडे जातो. 1845 मध्ये त्यांनी केलेले ज्ञानेश्वरीचे मुद्रण हे या ग्रंथाचे पहिले मुद्रण मानले जाते. बाळशास्त्रींनी कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणूनही काम पाहिले. तसेच त्यांनी नीतिकथा, इंग्लंड देशाची बखर, इंग्रजी व्याकरणाचा संक्षेप, हिंदुस्थानचा इतिहास, आदी ग्रंथांची निर्मिती केली. साधारणपणे 1830 ते 1846 या काळात बाळशास्त्रींनी आपले योगदान देशाला दिले. या काळात समाज बहुसंख्येने निरक्षर, अंधश्रद्धाळू व अज्ञानी होता. म्हणूनच अवघ्या 34 वर्षांच्या आयुष्यात, विविध क्षेत्रात त्यांनी केलेले प्रचंड कार्य मोलाचे ठरते. सहा जानेवारी रोजी दर्पणचा पहिला अंक प्रसिद्ध झाला.हाच योगायोगाने बाळशास्त्रींचाही जन्मदिवस आहे. तोच स्मृती दिवस पत्रकार दिन म्हणून आज महाराष्ट्रात साजरा केला जातो.महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी आपल्या पत्रकारितेचा वापर केला. त्याचबरोबर जातीभेद निर्मूलन आणि विधवा पुनर्विवाह यालाही त्यांनी प्राधान्य दिले. त्यामुळेच त्यांचा उल्लेख "आद्य समाजसुधारक" असा केला जातो. 1812 मध्ये जन्म झालेल्या बाळशास्त्री यांचे वयाच्या अवघ्या 34 व्या वर्षी 1846 मध्ये निधन झाले. मागील काळाचा विचार केला तर, त्यावेळी पत्रकारिता, वृत्तपत्र, हे व्रत होते. परंतु आता बदलत्या काळात त्याने व्यवसायाचे स्वरूप घेतले आहे. आता प्रिंट मीडिया- वृत्तपत्रे, आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया म्हणजे दूरसंचार सारखी माध्यमे प्रगत झालेली आहेत. पण त्या प्रगती बरोबरच त्यांच्या वर अनेक बंधने आली आहेत. कारण बहुतेक मोठी वृत्तपत्रे आणि दूरसंचार वाहिन्या हे कोणाच्यातरी अधिपत्याखाली आहेत. त्यांची वेगवेगळे मालक आहेत. अर्थातच ही भांडवलदार मंडळी आहेत. आणि आज ही सर्व भांडवलदार मंडळी राजकीय अर्थात सत्ताधारी पक्ष्यांच्या अंकित आहेत. म्हणजेच वृत्तपत्र वाहिन्या यांचे मालकांवर विचाराचा नाही म्हटलं तरी प्रभाव येतोच आणि त्यांच्यावर सरकारची दृष्टी ही असतेच. त्यामुळे त्यांच्या विरोधात जाऊन काही गोष्टी सत्य असल्या तरी दबावामुळे त्या बऱ्याच वेळा समोर येत नाही हे सत्य नाकारून चालणार नाही. मग त्या त्या वेळी जो पक्ष सत्तेवर असतो तो,पक्ष कुठलाही असो. त्यांच्याविरोधात लिहिल्या बातम्यांची नोंद घेतली जाते आणि मग आर्थिक दृष्ट्या मिळणाऱ्या जाहिरातींना फटका बसतो. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत प्रबोधनाचं साधन ते मार्केटिंग असं काही स्वरूप आले आहे. आताच्या काळात चर्चेमध्ये नेहमीच प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रोनिक मिडिया यांच्यावर आरोप केला जातो कि ते प्रवाहाच्या दिशेने जात असतात किंवा आपल्या मालकांच्या विचाराच्या दिशेने जात असतात,त्यांना त्यांच्याशी जुळवून घ्यावेच लागते. आता वृत्तपत्र व्यवसाय म्हणजे मोठ्या भांडवली गुंतवणूक हे समीकरण झाले आहे. त्यामुळे त्यासाठी जाहिराती हेच मोठं माध्यम आहे. त्यामुळे वृत्तपत्राच्या संपादकाला स्वतःचा म्हणून वेगळा विचार करून वृत्तपत्र चालवता येत नाही. वेगळा विचार मांडता येत नाही. त्या काळात जसे संपादकांच्या अग्रलेखातून परिवर्तन होत असे, आता तसे राहिले नाही . त्याला थोडे फारच वृत्तपत्र अपवाद ठरतील कारण फारच कमी म्हणजे पाच-दहा टक्के लोकच अग्रलेख, विशेष लेख वाचतात हा निष्कर्ष आहे. आजच्या काळात पत्रकारितेच्या उद्देशात बदल झालेला आहे. पहिल्या पानातच बातम्यांनी त्यांची भूक भागते असेच काहीतरी झाले आहे. लोकशाहीच्या चार स्तंभा पैकी माध्यम हा एक महत्त्वाचा चौथा स्तंभ मानला जात आहे. वृत्तपत्रांना समाजमनाचा आरसाही म्हणतात. परंतु सध्याच्या परिस्थितीत तो स्तंभ डळमळीत झाला आहे काय ? त्या आरशात स्पष्ट असे काही दिसत नाही का ?अशी शंका निर्माण होत आहे. अर्थातच वृत्त माध्यमांचे मनोरंजनीकरण झाले आहे, असा सूर अनेकदा होणाऱ्या चर्चांमधून वाचायला ऐकायला मिळतो. अनेकदा अनेक सत्य समोर आणतांना पत्रकारांवर हल्ले होतात. त्यादृष्टीने अशा पत्रकारांसाठी सुरक्षितता ही आवश्यक आहे. आपले विचार निर्भीडपणे मांडणे आणि आपली विवेकबुद्धी जागृत ठेवणे हे पत्रकारांन साठी महत्त्वाचे आहे. त्यासाठी पत्रकारांनी प्रवाहाच्याच दिशेने वाहत न जाता विरुद्ध दिशेलाही जाण्याचा प्रयत्न करायला हवा आहे. अर्थात केवळ विरोधासाठी विरोध म्हणून नाही. विचार करायची अवस्था निर्माण झालेली आहे. आणि तो झाला तरच अशी समाजमनाच प्रबोधन करणारी पत्रकारिता, शोधपत्रकारिता, टिकणार आहे. आज महाराष्ट्रात दर्पणकार बाळशास्त्रीं च्या स्मृतिप्रीत्यर्थ "दर्पणदिन" साजरा करतो. या दिवशी आपण या सर्व गोष्टींचा एकूणच सामाजिक, राजकीय, आणि प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया या सर्व पातळीवर विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे असे वाटते. वृत्तपत्र आणि पत्रकारिता हे व्रत म्हणून स्वीकारले जाईल तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने दर्पणदिन साजरा केला असे म्हणता येईल.

# उत्कंठा वर्धक रहस्यमय... आत्मचरित्र


आधुनिक केसरी

**"होय ! हे असंच आहे ! " संभाजीनगर येथील शीघ्र कवी सुप्रसिद्ध लेखक केशव भवानी काळे यांच्या " होय ! हे असंच आहे ! "या आत्मचरित्राच्या प्रथम आवृत्ती चे प्रकाशन नुकतेच संपन्न झाले. हे पुस्तक वैजनाथ वाघमारे शब्दवेध बुक हाऊस ने प्रकाशित केले. अक्षर जुळणी यश - विशाखा तर उत्कृष्ठ सुंदर आकर्षक असे मुखपृष्ठ पुण्याच्या संतोष घोंगडे यांनी तयार केले आहे. पुस्तकाची सुरुवातच शासकीय विद्या निकेतन संभाजीनगर च्या ' उद्धरावा स्वयें आत्मा ' च्या लोगोने होते. या पुस्तकात लेखक केशव काळे यांनी आपल्या बालपणीच्या आठवणी वाचकांसमोर ग्रामीण भाषेत सादर केल्या आहेत, त्या वाचत असताना वाचकही त्या त्या ठिकाणी फेरफटका मारून आल्याशिवाय राहत नाही.**

५५ - ६० वर्षांपूर्वीच्या गोष्टी पुराव्यासह वाचकां समोर सादर करणे सोपी गोष्ट नाही. ती केशवने अचूक मांडून वाचकाचा विश्वास संपादन केला. बालपणातील अठरा विश्व दारिद्र्य ...... त्यामुळे संसार चालवताना होणारी ओढाताण ... त्यातून कुटुंबाचे स्थलांतर .... नवीन ठिकाणी मिळणारा मायेचा आधार.. अर्धी भाकरी टोपल्यात असतानाही सर्वांचे रात्री उपाशी झोपणे .... अगदी मनाला चटका लावून जाते. माझे बाई - आप्पा, चिखलठाण शाळा, पब्लिक स्कूल मधील स्कूल कॅप्टन, दहावी मराठीचा पेपर, संत तुकाराम होस्टेल, मौंटेनिअरिंग, सर्व भाग पुस्तक वाचायला घेतल्यानंतर एका दमात वाचून काढावेसे वाटतात. तहान भूक विसरून मन एकाग्र होऊन जाते. लेखकाबरोबर आपणही सर्वत्र वावरत असतो.

माझं पहिले भाषण बालवयातील केशवचा सभाधीटपणा मनाला भाऊन जातो,....अगदी खरेच आपणही केशव आहोत असेच वाटल्याशिवाय राहत नाही. शासकीय विद्या निकेतन मधील प्रवेशाचे प्रकरण त्याकाळातील ५० रुपया वरून अडणे.... बसून राहणे ... उस्मानाबाद जिल्ह्यातील विनायकराव पाटील यांनी ते पैसे भरणे ही घटना तर अगदी समोर घडतेय असाच भास झाल्याशिवाय राहत नाही.

अगदी छोटे छोटे बारकावे लेखकाने अचूक हेरून वाचकांना जोडून ठेवण्याचे काम केले आहे. बालपणातील शाळेच्या आठवणी, शाळेतील गमतीजमती, प्रेरणा दायी घटना वाचताना ऊर अभिमानाने भरून येतो, ५० वर्षांपूर्वीचे फोटो पाहताना लेखक आपल्या ला पुन्हा त्या वातावरण घेऊन जाण्यात यशस्वी होतो.




तसेच कॉलेज जीवना बाबतीत ही घडते. शासकीय कॉलेज तेथील मेस त्यावेळेची होस्टेल ची ६ नंबर ची रूम प्रदीप पाटील मकरंद चौधरी रुममेन्ट सर्व काही डोळ्यासमोर उभे राहते. टेलिफोन खात्याची नोकरी ती करत असताना केलेले इंजिनिअरिंग कॉलेज, हे सर्व सहन न होणारा मित्र, त्याने प्रवेश रद्द व्हावा म्हणून केलेले प्रयत्न ... केशवने दिलेली प्रामाणिक झुंज त्यातून प्रचार्यांचे मन जिंकणे. सिडको मध्ये इंजिनिअर ची नोकरी....... त्या काळात लाच नाकारणे ..... मिळत असलेले पैसे नाकारणारा व्यक्ती या पृथ्वी तलावावर असूच शकतो ही गोष्टच आज मनाला खरी वाटत नाही.... पण केशवने ही गोष्ट पुराव्यानिशी सांगितली आहे ...... वाचून मन गलबलून आल्याशिवाय राहत नाही ..... अभिमानाने छाती भरून येते. एमपीएससी मुलाखतीत कमी मार्क देऊन जाणुन बुजून पद नाकारणे एकदा नव्हे तर चार वेळा ..........शेवटी लाथ मारतो अश्या नोकरीवर हे वाचून असे वाटते की हा केशववर नाही तर आपल्या वर झालेला अन्याय आहे......... त्या नंतर एलआयसी मध्ये विकास अधिकारी म्हणून नोकरी.सर्व काही अनाकलनीय वाटले.... पुस्तकातील प्रत्येक भाग मग टेलिफोन - नाशिक, नांदेड पैठण व औरंगाबाद, भन्नाट मैत्री, रक्तदान, मैत्री - इंजिनिअर सुनील डाके, बिनधास्त, लचांड, नियती ! एमपीएससी, स्मशानातील कविसंमेलन, आत्मविश्वास ! श्याम मानव, माझ्या गाड्या, मधुशाला , चित्रपट - कथा - पटकथा, संवाद !, मनोनिग्रह मी लाच घेतली नाही, अश्या एकापेक्षा एक भन्नाट कथा वाचून मन अगदी तृप्त झाल्यासारखे वाटते.

पुस्तक वाचताना कोणत्याही ठिकाणी कंटाळवाणे वाटत नाही....... पुढे काय घडणार आहे याची उत्कंठा कायम लागून राहते....... वाचकाला बांधून ठेवण्याचे कसब केशव काळेंच्या लेखनी मध्ये नक्कीच आहे,.........हा आत्मकथेचा पूर्वार्ध आहे ..... उत्तरार्धात कोनाकोणावर काळेंचा काळ कोसळणार हे काळच ठरवेल. हे आत्मचरित्र वाचल्यानंतर उत्तरार्धाची उत्कंठा वाढल्याशिवाय राहत नाही. पूर्वार्ध जवळपास ५०० पानांचा आहे. योग्य टाईपसेट ....उत्कृष्ठ मांडणी ..... ,उत्तम प्रिंटिंग व बायडिंग आकर्षक मुखपृष्ठ लक्ष वेधून घेतल्याशिवाय राहत नाही.

पुस्तक - " होय ! हे असंच आहे ! "
प्रथम आवृत्ती - २४ ऑक्टोबर २०२३
लेखक - केशव भवानी काळे।
9404000700
प्रकाशक - वैजनाथ वाघमारे
मुद्रक - रंगनाथ क्रियेशन
किंमत - ७०० रुपये

# शिक्षकी पेशाचे पावित्र्य...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**डॉक्टर, इंजिनिअर, जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक, मुख्यकार्यकारी अधिकारी, न्यायाधीश, आयुक्त, मुख्य सचिव, सचिव, तहसीलदार, गटविकास अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी आणि कुलगुरू ह्या पदांवर नोकरी करणाऱ्या नोकरदार मंडळीचे समाजाला व लोकांना फार मोठे आकर्षण असते. ह्या सगळ्या अधिकाऱ्यांना साहेब संबोधले जाते. अतिशय हुशार असणारे विद्यार्थी अशा मोठ्या पदावर नोकरी करण्याचे स्वप्न बघत असतात. आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करतात.अशा मोठ्या पदावर नोकरी करणाऱ्या नोकरदारांचे जीवन अतिशय बहारदार व व्यक्तिमत्त्व कसे रुबाबदार असते.**

ह्यांना पगार ही जास्त असतो. परंतु धकाधकीच्या व अतिशय व्यस्त अशा मानवी जीवनात झपाट्याने बदल घडत आहेत. समाज परिवर्तन होत आहे. माणसांचे जीवन अतिशय गतिमान झाले आहे.तरीपण आजही समाजात व जनतेच्या मनात शिक्षकांचे जे आदराचे स्थान आहे ते किंचित सुध्दा कमी झालेले नाही. ह्यातच शिक्षकी पेशाचे मोठेपण व पावित्र्य दडलेले आहे.आजही समाज शिक्षकांकडे आदरानेच पहातो.

सावित्रीबाई फुले, साने गुरुजी, प्राचार्य शिवाजीराव भोसले, प्राचार्य ना.य.डोळे,डॉ.जनार्धन वाघमारे हे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिक्षक व प्राध्यापक आहेत. यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य अद्वितीय आहे. वेगवेगळ्या शाळा महाविद्यालयांत काही शिक्षक व प्राध्यापक हे तेथील विद्यार्थ्यांचे आवडते व आदर्श व्यक्तिमत्व असतात.कारण हे शिक्षक व प्राध्यापक चांगले मार्गदर्शन करून व प्रभावी अध्यापनाने विद्यार्थ्यांना घडविण्याचे पवित्र कार्य करतात. एकेक पिढी व देशाचे भावी नागरिक घडविताना शिक्षकांना वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात.शिक्षक हे फक्त शिक्षक नसतात तर ते विद्यार्थ्यांचे कधी बेस्ट फ्रेंड,कधी भाऊ,कधी काका, कधी मामा, तर कधी निर्मळ मनाचे हितचिंतक असतात आणि शिक्षिका विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नशील असतात.विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचा फार मोठा वाटा असतो. बहुतांश विद्यार्थी हे शिक्षकांचे अनुकरण करतात. म्हणून शिक्षकांनी स्वतःच स्वतःला काही बंधने लावून घ्यायची असतात आणि काही मर्यादा पाळायच्या असतात. शिक्षकांनी वेळेवर शाळेत जावे व वेळेवर वर्गात जाऊन शिकवावे. शिक्षकांना कोणत्याही व्यसनाची तलफ असता कामा नये. तसेच शिक्षकांचे वर्तन,भाषण व अध्यापन दर्जेदार असले पाहिजे.शिक्षकांचे चारित्र्य बावनकशी सोन्यासारखे शुद्ध असावे. वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला समजेल असे शिकवले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे व त्यांचे योग्य निराकरण करणे हे शिक्षकांना जमले पाहिजे.यालाच तर शिक्षकी पेशाचे पावित्र्य म्हणतात.हे पावित्र्य जे शिक्षक जपतात त्यांना समाजात व जनमानसांत मान सन्मान हमखास मिळतो.यावेळी मला माझ्या



काही शिक्षकांची आठवण येते कारण त्यांनी त्यावेळी शिक्षकी पेशाचे पावित्र्य जपले होते.गणेशराव गुळवे गुरुजी, अप्पाराव लोहारे,बंकटराव गरड, अनंतराव बोरोळे,गंगाधरराव मोरे आणि संभाजी परगे, प्रा.सतिश चव्हाण हे शिक्षक आजही माझ्या साठी आदर्श आहेत. हणमंतराव कमलापुरे, माधवराव वाघमारे, शिवदास माटोरे, रामराव चव्हाण, विश्वनाथ विळेगावे, कार्तिक घाटीवाले, शिवराज गोरगे, एकनाथ पलमटे, बळीराम काकडे, रामचंद्र देमगुंडे हे माझे सहकारी शिक्षक व मुख्याध्यापक होते ज्यांनी शिक्षकी पेशाचे पावित्र्य नेहमीच जपलेले आहे. अहमदपूर येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशाताई रोडगे, मनकर्णा राठोड, महादेवी हुडगे, मंदोदरी सुरनर, शांताताई भोसले, गयाबाई लहाने,अयोध्या घोगरे, सत्यभामा मद्देवाड, इंदुमती गुट्टे या शिक्षिकांनी विद्यार्थ्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले आहे. तसेच माझे काही शिक्षक मित्र आहेत जे शिक्षकी पेशाला जीवापाड जपतात आणि आपल्या कार्याने त्यांनी ठसा उमटवला आहे.बालाजी तुरेवाले, बालाजी शिंदे,शिवाजीराव वाघमारे,दिपक फुलारी, मोहिते दत्तात्रय या व इतर शिक्षकांचे शैक्षणिक कार्य उल्लेखनीय आहे.यांनी शिक्षकी पेशाचे पावित्र्य नेहमीच जपलेले आहे.या सर्वांच्या संगतीने मलाही शिक्षकी पेशाचे पावित्र्य जपण्याची कला आत्मसात करता आली आहे. माझ्या शिक्षकी पेशाला वीस वर्षे पूर्ण झाली आहेत.माझ्यासाठी ही फार मोठी गोष्ट आहे.जे जे शिक्षक विद्यार्थी हिताला प्राधान्य देतात व शिक्षकी पेशाचे पावित्र्य जपतात त्यांना माझा सलाम!

# शहरात तीन दिवसीय पोटविकार तज्ज्ञांची परिषद; देशभरातील डॉक्टरांचा असणार समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** ऐतिहासिक छत्रपती संभाजीनगर शहरातील हॉटेल अँबेसेडर येथे येत्या 5, 6 व 7 जानेवारी 2024 दरम्यान दुसऱ्या GI SYMPOSIUM 2024 या परिषदेचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये पोटविकार व अत्याधुनिक उपचार पद्धतीवर चर्चा व मार्गदर्शन घडवून आणले जाणार आहे. देशभरातील पोटविकार तज्ञ मंडळी यावेळी उपस्थित राहणार आहेत. जीआय वन हॉस्पिटल, फिजिशियन असोसिएशन औरंगाबाद व सर्जिकल सोसायटी ऑफ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दुसऱ्या GI SYMPOSIUM 2024 या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ डॉक्टर सहभागी होऊन पोटविकार, लिव्हरच्या विविध आजार, निदान व अत्याधुनिक उपचार पद्धतीने रुग्णांना कशाप्रकारे दिलासा देता येईल यावर मंथन करतील. विशेष म्हणजे या परिषदेत पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार मिळवलेले आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पोटविकार तज्ज्ञ डॉ. डी. नागेश्वर रेड्डी व अमेरिकेतील मिलवॉकी येथील डॉ. कुलविंदर दुआ यांची उपस्थिती असणार आहे. यासोबत हैदराबाद येथील एशियन इन्स्टिट्यूट ऑफ गॅस्ट्रोइन्टेरोलॉजीच्या शल्य चिकित्सा विभागाचे प्रमुख डॉ. जि वि राव, डॉ. आर. प्रदीप, मुंबई येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे डेप्युटी डीन तसेच पचनसंस्थेच्या कर्करोग विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र श्रीखंडे, इंडियन मेडिकल सोसायटी ऑफ गॅस्ट्रोइन्टेरोलॉजीचे माझी अध्यक्ष, बंगलोर येथील तज्ज्ञ डॉ. नरेश भट, सायन हॉस्पिटल मुंबई येथील डॉ. प्रवीण राठी, के इ एम हॉस्पिटल मुंबई येथील पोटविकार तज्ज्ञ डॉ. अभय दळवी व डॉ. समीर रेगे आणि दीनानाथ मंगेशकर येथील प्रसिद्ध पोटविकार तज्ज्ञ डॉ. अमोल बापये यांच्या प्रामुख्याने समावेश असेल त्यांच्या व्यतिरिक्त इतर पोटविकार तज्ज्ञ या कार्य शाळेत डॉक्टरांना संबोधित करतील. तीन दिवसीय परिषदेदरम्यान जीआय वन हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करून ती परिषदेतील उपस्थित डॉक्टरांना थेट प्रक्षेपण केले जाईल. पोटविकाराच्या विविध समस्यांचे अत्याधुनिक उपचार पद्धतीने निराकरण करताना महाराष्ट्रातील डॉक्टरांना याविषयी माहिती व्हावी हा या परिषदेचा मुख्य हेतू असणार आहे.

या पत्रकार परिषदेवेळी फिजिशियन असोसिएशनचे डॉ. संजय पाटणे, डॉ. अनंत कुलकर्णी, सर्जिकल सोसायटी ऑफ औरंगाबादचे अध्यक्ष डॉ. नारायण सानप, सचिव डॉ. सत्यजित पाथ्रीकर, GI ONE हॉस्पिटलचे डॉ. संदीप भालसिंग, डॉ. मुकेश राठोड, डॉ. विनय झंवर, डॉ. वैभव गंजेवार, डॉ. अशोक मोहिते यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. GI SYMPOSIUM चे संयोजन सचिव डॉ. अशोक मोहिते यांनी सांगितले कि, भारत व परदेशातील पोटविकार तज्ज्ञ डॉक्टरास या अधिवेशन आणि कार्यशाळेत फिजिशियन आणि सर्जन यांना मार्गदर्शन करणार आहेत, तसेच कार्यशाळेद्वारे विविध शस्त्रक्रिया दाखवून, जगामध्ये




सध्या वाढत जाणाऱ्या प्रगत तंत्रज्ञानाविषयी सर्वांना अवगत करणार आहेत. फिजिशियन असोसिएशनचे डॉ. संजय पाटणे यांनी सांगितले कि, पूर्वी शहरातील डॉक्टरांना पोटविकार संबंधात चर्चा करायची असल्यास मुंबई अथवा इत्तर मोठ्या शहरातील तज्ञाशी संपर्क साधावा लागे. आम्ही अश्या तज्ञाच्या व्याख्यानाची अत्तुरारतेने वाट पाहत असू, परंतु GI - SYMPOSIUM च्या माध्यमातून अश्या तज्ञ डॉक्टरांशी सवांद साधनांची संधी मिळत असून त्याचा ज्ञानाचा आणि अनुभवाचा लाभ आपला परिसरातील सर्व तज्ञ मिळवतील अशी खात्री मला वाटते. सर्जिकल सोसायटी ऑफ औरंगाबादचे अध्यक्ष डॉ. नारायण सानप, यांनी सांगितले कि, पोट विकार शात्रातील सर्व तारे, य कार्यशाळा आणि अधिवेशनाच्या माध्यमातून संभाजी नगर मध्ये येत आहेत. आम्हा सर्व सर्जनेर आणि फिजिशियन त्याचा प्रदीर्घ अनुभवाचा लाभ घेणाची उत्तम संधी मिळत असल्यामुळे औरंगाबाद सर्जिकल सोसायटीचे सर्व सदस्य या अधिवेशनाचा नक्की लाभ घेतील. सर्जिकल सोसायटीचे सचिव डॉ. सत्यजित पाथ्रीकर म्हणाले की, या कार्यशाळेच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रथमच एखाद्या चर्चा सत्राला अशे तज्ञ डॉक्टर्स आपल्याला लाभलेले आहेत.



# वाढीव वस्तीसाठी गायरान जमीन द्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील मौजे मेहरगाव येथील आदिवासी बांधवांसाठी वाढीव वस्ती करिता मेहरगाव शिवारातील गायरान गट क्र. 324 क्षेत्र आठ हेक्टर 59 आर ही जमीन देण्यात यावी. अशा मागणीचे निवेदन एकलव्य आदिवासी युवा संघटनेचे प्रदेश अध्यक्ष राजकुमार सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली मेहरगाव येथील आदिवासी बांधवांनी जिल्हा प्रशासनाला दिल आहे. धुळे तालुक्यातील मेहरगाव गावात आदिवासीं समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. गावातील आदिवासी बांधवांना घरकुल सारख्या योजनेचा लाभ मिळत असला तरी हक्काचं घर बांधण्यासाठी गावात जागा मिळत नसल्याची व्यथा येथील नागरिकांनी व्यक्त केली आहे. एकाच घरात दोन ते तीन कुटुंबाचा निवारा होत असून त्यातच या कुटुंबाची चूल पेटत आहे. यामुळे अनेक समस्यांना या नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे येथील नागरिकांना घरकुल सारख्या योजनेचा लाभ देण्याबरोबर जमिनीची देखील सोय करावी अशी मागणी ही यावेळी करण्यात आली आहे. तसेच गावातील गायरान गट क्र. 324 क्षेत्र आठ हेक्टर 59 आर ही वाढीव वस्तीसाठी देण्यात यावी. अशी मागणी मेहरगाव येथील नागरिकांनी केली आहे. या मागणीचे निवेदन एकलव्य युवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजकुमार सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासनाला देण्यात आल आहे.तर या गायरान जमिनीवरील चार हेक्टर जागेवर धनगर समाज वस्ती झाली असून त्यांनी टिळे नगर म्हणून या वस्तीलाही नाव दिल आहे. तसेच या जमिनीवर शासकीय योजनेच्या माध्यमातून त्यांनी घर बांधली आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांना ही वाढीव वस्तीसाठी या जमिनीची परवानगी देऊन अंमलबजावणी करावी अशी मागणी आदिवासी समाज बांधवांनी केली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया फ्रंटच्या प्रदेश सचिवपदी वायझोडे

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** तालुक्यातील येनगाव येथील रहिवासी असणारे आशिष वायझोडे यांनी पक्षात केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया फ्रंटच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व सोशल मीडिया फ्रंटचे अध्यक्ष महादेव बालगुडे, सहअध्यक्ष मोहसीन शेख यांच्या आदेशाने त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एका सर्वसामान्य कार्यकर्त्याला पक्षाने न्याय दिला आहे, याविषयीचे नियुक्तीपत्र त्यांना प्रदेशाध्यक्ष महादेव बालगुडे यांनी मीडियाच्या माध्यमातून प्रसिद्ध केले. प्रसेनजीत पाटिल यांचे निकटवर्तीय असलेले आशिष वायझोडे राजकीय व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून नियुक्ती बद्दल त्यांनी पक्षाचे सर्व वरिष्ठ मंडळी तथा पक्षाचे नेते प्रसेनजीत पाटिल यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत.तसेच पक्ष वाढीसाठी व शरदचंद्र पवार साहेब यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवीण्यासाठी कठीबद्ध असल्याचे



आशिष वायझोडे यांनी सांगितले.

# श्री नाथ ज्युनिअर कॉलेज पैठण येथे आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर व सोशल एमपावरमेंट व्हॉलंटरी असोसिएशन, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम श्री नाथ ज्युनिअर कॉलेज पैठण येथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण सुमारे दीडशे विद्यार्थ्यांना प्रत्यक्षिका सहीत देण्यात आले. यावेळी रविकिरण काळेकर मास्टर ट्रेनर व सहाय्यक बाळासाहेब पेडगावकर मछिंद्रनाथ पंडित यांनी पुर,आग,भुकंप या निसर्गनिर्मित व अपघात,गर्दी अशा ठिकाणी होणाऱ्या आपत्ती मधे जीवित हानी टाळण्यासाठी कशा पध्दतीने उपलब्ध साधन सामग्री च्या सहायाने सुटका करावी तसेच प्रथमोपचार कसा करावा या बाबत प्रायक्षिका सहित प्रशिक्षण दिले दोरी च्या सहायाने आग लागल्यास कसे बाहेर पडावे, तसेच रुमला पासुन तयार करावाचे बैंडेज या साठी,विद्यार्थ्यांच्या सहभागाने हे शिबिर माहिती दर्शक झाले या वेळी प्राचार्य शिवाजी पठाडे,पर्यवेक्षक



प्रा.संतोष गव्हाणे,शिवाजी जगताप,सुनील चितळे,रामनाथ कानडे यांचे सह जिल्हाधिकारी कार्यालय येथील आपत्ती व्यवस्थापन पथक व स्वयंसेवी संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले जयंतीचे औचित्य साधून केले व्याख्यानाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी.रामपूरकर**

**जिंतूर :** मुलींनो सावित्री सारख्या धाडसी व्हा, विविध क्षेत्रात भरारी घ्या आणि आपल्या उच्च शिक्षणाचा फायदा घेत समाज घडवण्याचे कार्य करा तसेच स्त्रियांनी बंदिस्त वातावरणात न राहता स्वतःला घडवण्यासाठी बाहेर पडा, पुस्तकांचे वाचन करून ज्ञान समृद्ध करा असे प्रतिपादन प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये यांनी केले. जिंतूर येथील संत सावता महाराज सभागृहात सावित्रीबाई फुले महिला बचत गटातर्फे आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा मीना तायडे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.सचिन राऊत उपस्थित होते. या कार्यक्रमात डॉ. अनुराधा लांडगे यांचा वैद्यकीय अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल तर मीना कंठाळे यांचा उत्कृष्ट व्यावसायिक म्हणून बचत गटातर्फे सत्कार करण्यात आला. निकिता गुंजाळकर या विद्यार्थिनींने मी सावित्रीबाई बोलते हा अभिनय सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.अशोक वैद्य, सूत्रसंचालन प्रकाश डूबे तर आभार प्रदर्शन संजय जवळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बचत गटाच्या अध्यक्षा सुनीता पाचलेगावकर, सुमन लांडगे, लता राऊत जयश्री गोरे , मीनाक्षी पाचलेगावकर, सविता इंगोले, ज्योती वैद्य, उषा मुंजे, शोभा कटारे, कमल इखे, नेहा हरकळ, दैवशाला उकंडे, अर्चना जंगले, सुनीता मोठे, राधा मोहोळे, रेखा लांडगे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात पुरुष ,महिला रसिक श्रोते उपस्थित होते.



# फुलंब्री तालुका अध्यक्षपदी विनोद कसारे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** रिपब्लिकन पॅंथर आर्मी फुलंब्री तालुका अध्यक्षपदी विनोद कसारे आंबेडकरवादी संघर्ष समितीचे अध्यक्ष श्रावण दादा गायकवाड यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले यावेळी विनोद कसारे यांचा वाढदिवसानिमित्त विनोद भाऊ कासारे युवा मंच वतीने शासकीय रुग्णालयामध्ये फळ वाटप व जिल्हा परिषद रेलगाव येथे शालेय साहित्य वाटप करण्यात आले फुलंब्री तालुक्यातील मित्रमंडळाकडून शुभेच्छाचा वर्षाव केला यावेळी विनोद कासारे फरियाणा शहा अतुल रघु सागर शेजवळ शाहरुख शेख शेरखान भाई सचिन कासारे मुकेश थोरात सचिन थोरात समीर शेख सुरज जगधने आंबेडकरवादी संघर्ष समितीचे तालुकाध्यक्ष भगवान भाऊ गंगावणे रणजीत वाहूळ गुड्डू शेख सागर शेजवळ अंकुश कसारे संतोष क्षीरसागर फरियाणा शहा इतर उपस्थिती होती



# आ. जितेंद्र आव्हाड यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची येवला भाजपाची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**येवला :** ०३ जानेवारी रोजी शिर्डी या ठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गट यांचे अधिवेशन होते. सदर अधिवेशनात सर्व पक्ष कार्यकर्त्यांसमोर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रभुराम चंद्र हे १४ वर्षाच्या वनवासाच्या कालखंडामध्ये पशु पक्षी मारून मांसाहार करीत होते असे घृणास्पद वक्तव्य करत आमचे आदर्श प्रभु श्री रामचंद्र हे मांसाहार करीत होते म्हणुन आम्ही मटण खातो. त्याचप्रमाणे प्रभु रामचंद्र हे केवळ आमच्या बहुजनांचे आहेत त्यामुळे प्रभु रामचंद्र हे फक्त बहुजनांचेच आहेत. अशा पध्दतीने जातीयवादी तेढ निर्माण करणारे, दंगल भडकविणारे व हिंदुच्या धार्मिक भावना दुखावणारे वक्तव्य जाणीवपूर्वक केलेले आहे. त्यामुळे खालील सर्व प्रभु श्री रामचंद्र भक्त स्वाक्षरीदारांचे आणि तमाम हिंदुंच्या धार्मिक भावना दुखावलेल्या आहेत.

तरी या जातीवादी जितेंद्र आव्हाड यास तात्काळ अटक करून फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करावा या साठी भाजपा नाशिक जिल्हा महामंत्री आनंद शिंदे यांच्या नेतृत्वात कु.हर्षाली वडे या युवतीच्या हस्ते येवला शहर पोलीस निरीक्षक पाटील यांना तक्रार अर्ज देण्यात आला. या प्रसंगी भाजपा शहराध्यक्ष मिननाथ पवार, अखंड हिंदू परिवाराचे गणेश ठाकुर, मयुर लकारे, भाजपा जेष्ठ नेते रमाकांत भावसार, धनंजय कुलकर्णी, जयंत गंगापुरकर, इतिहास संशोधक नारायणराव क्षिरसागर,

राष्ट्रपुरुषांचा कायम अवमान करणारे आमदार जितेंद्र आव्हाड हे देशात अराजकता वाजवण्याचे उद्देशाने उपद्रवी वक्तव्य कायम करीत असतात त्यातलाच हा प्रकार असून आम्ही गृहमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना निवेदन करतो की अशा देश विघातक शक्तींचा आपण कायमचा कायदेशीर नायनाट करावा !
**आनंद शिंदे , भाजपा जिल्हा महामंत्री .**

सरचिटणीस युवराज पाटोळे, चेतन धसे, सहकार आघाडीचे शहराध्यक्ष बाळासाहेब देशमुख, देविदास भांबारे, अमित टोंपे, निलेश माडीवाले, सौरभ गडकर, भाजपा कोषाध्यक्ष बडाअण्णा शिंदे, संतोष काटे, भाजपा शहरउपाध्यक्ष सागर नाईकवाडे, संतोष नागपुरे, अमोल पांगुळ, अमर छतानी, महेश वडे, सचिन धकाते, धनंजय नागपुरे, विणकर आघाडीचे अध्यक्ष निलेश परदेशी, संतोष सासे, रोहीत बोळे, तरंग गुजराथी, संभाजी डुकरे, बाळासाहेब शिंदे, परेश आढाव, लखन परदेशी, सुदर्शन पंडोरे, दत्ता शिंदे, दिपक चव्हाण, संतोष खैरनार, शरद वरोडे, आदेश काळे, कृष्णा शिकलकरी, रोहीत सोनवणे, जालिंदर मोरे, ईश्वर आहेर, अशोक गुजर, सुर्यकांत नागपुरे, अनिकेत गायकवाड, विशाल कोरडे, पंकज गुंजाळ, मनोहर मोरे, रविंद्र वाघ, शैलेश देसाई, सुभाष भागवत, राहुल आहिरे, करण देसाई, दिपक शिंदे, अमोल माळी, धनंजय मोरे, राहुल बडे, संतोष मांडावे या सह असंख्य श्रीराम भक्त उपस्थित होते.



# एमएमआरडीएच्या विरोधात ग्रामस्थांचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** बहुचर्चित शिवडी - न्हावा शेवा लिंकचे (महामार्गाचे) काम पूर्ण झाले असून या शिवडी न्हावा शेवा लिंक (अटल सेतू मार्ग)चे उदघाटन शुक्रवार दि १२ जानेवारी २०२४ रोजी भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे.सुमारे २१ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या आणि २२ किलोमीटर लांबीच्या 'शिवडी न्हावाशेवा अटल सेतू' उद्‌घाटनाच्या प्रतिक्षेत आहे.मात्र हे सेतू (मार्ग) मुंबई येथून सुरु होउन रायगड जिल्हयातील उरण तालुक्यातील चिर्ले गाव येथे संपणार आहे. चिर्ले ग्रामपंचायत हददीत या मार्गाचा समारोप होणार आहे. शिवडी न्हावा अटल सेतू हा प्रकल्प राबविताना एमएमआरडीए प्राधिकरणाने व महाराष्ट्र शासनाने चिर्ले ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील सर्व विकासकामे पूर्ण करण्याचे व नुकसानग्रस्त बाधितांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र एमएमआरडीए व महाराष्ट्र शासनाने दिलेले वचन न पाळल्याने तसेच ग्रुप ग्रामपंचायत चिर्ले व चिर्ले ग्रामस्थांची मोठी फसवणूक केल्याने एमएमआरडीए अणि महाराष्ट्र शासनाचा निषेध करण्यासाठी विविध विकासकामे पूर्ण व्हावीत या मागणीसाठी ग्रुप ग्रामपंचायत चिर्ले व ग्रामस्थांतर्फे शुक्रवार १२ जानेवारी २०२४ रोजी अटल सेतूचा जिथे मार्ग संपतो त्या चिर्ले ग्रामपंचायत हद्दीतील मार्गालगत जन आंदोलन करण्यात येणार आहे.



# सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त वृध्दांना किरणा किटचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**नेर :** समता शिक्षण संस्था पुणे संचालित डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रामीण व शहरी विकास प्रकल्प धुळे आणि फर्स्टक्राय संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यामाने बुधवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने विश्वासनगर, कुंडाणे आणि आदिवासी वस्ती, मोराणे उपनगर येथील ५० वृध्दांना मोफत किराणा वाटप कार्यक्रम विश्वासनगर, कुंडाणे येथे सकाळी 11:00 वाजता आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे येथे दुपारी 3: 00 वाजता आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.जालिंदर अडसुळे (सचिव, समता शिक्षण संस्था, पुणे व संचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रामीण व शहरी विकास प्रकल्प, धुळे) हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. किरण चिंदरकर ( प्रतिनिधी, फर्स्टक्राय संस्था, पुणे ), मा. आर. एम. दोंदे (सह दुय्यम निबंधक महसूल विभाग,धुळे,) मा.सागर नेमाने (मंडळ अधिकारी, मोराणे (प्र.ल.) धुळे, मा.प्रशांत काकडे (तलाठी, मोराणे व कुंडाणे) मा.मनोहर भामरे (मुख्याध्यापक, कै. चि. अभिजित ठाकरे माध्यमिक शाळा, मोराणे), डॉ. प्रा. विष्णू गुंजाळ (प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे), मा.प्रा.रचना अडसुळे (समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रामीण व शहरी विकास प्रकल्प,धुळे), डॉ.प्रा. रघुनाथ महाजन (प्राध्यापक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे). उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रसंगी विश्वासनगर, कुंडाणे येथील 30 वृद्धांना तर आदिवासी वस्ती मोराणे (प्र.ल.) धुळे येथील 20 वृद्धांना अशा एकूण-50 वृद्धांना मोफत किराणा वाटप करण्यात आला. ह्यात अतिशय गरीब आदिवासी व दलित वृद्धांचा समावेश होता. त्यांच्या स्थानिक खाण्याच्या सवयी आणि पोषण मूल्य लक्षात घेऊन १० किलो बाजरी, ५ किलो गहू, ३ किलो तेल, २ किलो चना डाळ, १ किलो तूर डाळ, १ किलो मटकी, १ किलो चवळी, 2 किलो गुळ, १ किलो पोहे व आर्धा किलो खोबरे इत्यादी ह्या वस्तूंचा समावेश होता. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.प्रा.रचना अडसुळे यांनी केले. त्यांनी प्रकल्पाद्वारे वृध्दांसाठी विविध कार्यक्रम राबविले जातात याविषयी माहिती दिली. त्यानंतर डॉ. प्रा. विष्णू गुंजाळ ह्यांनी ही वृध्दांशी हितगुज करतांना म्हणाले कि प्रकल्पाद्वारे अतिशय चांगला उपक्रम राबविला जात आहे. असा उपक्रम कोणत्याच महाविद्यालय कडून राबविला जात नाही. मा. आर. एम. दोंदे हे वृध्दांशी बोलताना म्हणाले कि, अशा प्रकारचा वृध्दांचा गट मी प्रथमच पाहिला व प्रकल्पाचे काम पाहून मला खूपच आनंद वाटत आहे. मा.मनोहर भामरे हे बोलताना म्हणाले कि, वृद्धांसाठी प्रकल्पाच्या माध्यमातून खूपच चांगले कार्यक्रम राबविले जात आहेत व त्यामुळे वृद्धांना मोठा आधार मिळत आहे.

# ज्ञानसागर वाचनालयात महिला फेडरेशनच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले



यांच्या जयंतीनिमित्त दिनानिमित्त ज्ञानसागर वाचनालय व भारतीय महिला फेडरेशन च्या वतीने विठ्ठल नगर या ठिकाणी बुधवार दी.3 जानेवारी 24 सायंकाळी कार्यक्रम घेण्यात आला. आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या अनिता भगत यांनी आपले विचार मांडले ते म्हणाले की, सावित्री बाई मुळेच मी आज आपणा समोर उभी राहू शकले, त्यानीं जर मुलींची शाळा काढली नसती तर आज मी तुमच्या समोर उभी राहू शकले नसते, सावित्री बाई चे महिलांवर फार मोठे उपकार आहेत हे आपण लक्षात घेतले पाहिजे. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेखा लहाने या उपस्थित होत्या त्यांनीही या प्रसंगी आपले विचार मांडले. याप्रसंगी मुलींनी सावित्री बाई वर गीत, कविता, भाषणे केली. कार्यक्रमा चे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन संस्थेचे सचिव भास्कर लहाने यांनी केले तर आभार अडवोकेट मिलिंद काकडे यांनी केले या कार्यक्रमासाठी वाचनालयाचे अध्यक्ष वी.सी. खपले , श्रद्धा नवकर समृद्धी टाक आदिती टाक श्रावणी निकाळजे माही नावकर आरती वाडेकर पुनम हिवराळे पूनम निकाळजे आकांक्षा बनकर शालिनी भुतकर जानवी महाजन कृषी सुरडकर विद्या काकडे , आदित्य लहाने आदी, महिला,नागरीक,विद्यार्थी उपस्थित होते.



# इंडियन प्लंबिंग असोसिएशन समितीची निवड; 25 व्या मराठवाडा चॅप्टरची औपचारिक घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** इंडियन प्लंबिंग असोसिएशन ही एक एनजीओ आहे, जी भारतातील प्लंबिंग व्यावसायिकांची सर्वोच्च संस्था आहे. प्लंबिंग आणि बिल्डिंग सेवा उद्योगाच्या विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने 1993 मध्ये स्थापन केलेली एनजीओ, आयपीएचे सदस्यत्व बांधकाम उद्योगाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे गुंतलेल्या प्रत्येकासाठी खुले आहे. इंडियन प्लंबिंग असोसिएशनमध्ये कन्सल्टन्सी, मॅन्युफॅक्चरिंग, कॉन्ट्रॅक्टिंग, ट्रेडिंग, ॲकॅडेमिया आणि आर्किटेक्चर यासह बांधकाम उद्योगाच्या प्रत्येक विभागातून देशभरात 5000+ सदस्य आहेत. आयपीएचे मुख्यालय नवी दिल्ली येथे असून संपूर्ण भारतात 24 शाखा असून 25 व्या आयपीए मराठवाडा चॅप्टरची औपचारिक घोषणा करण्यात आली. खालील समितीची एकमताने निवड करण्यात आली. चॅप्टर चेअरमन प्रभंजन महातोले, उपाध्यक्ष अहमद आझमी, सचिव शोएब शेख, सहसचिव रमेश अग्रवाल, कोषाध्यक्ष आनंद गंगापूरवाला, कार्यकारिणी सदस्य दीपक संघाई, श्रीरंग फरकाडे, दौलत जाधव, कुबेर यांची निवड करण्यात आली. यावेळी प्रदीप शर्मा यांनी आभार व्यक्त केले. सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानण्यात आले. प्लम्बिंग विषयावर विविध कार्यशाळा दर महिन्याला आयोजित करण्याचा समितीचा मानस आहे असे प्रभंजन महातोले यांनी सांगितले.

# भोकर येथील आयान शेखच्या अंधांच्या काठीस प्रथम क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी टाकाऊ पदार्थांपासून टिकाऊ साहित्य करण्याची स्पर्धा घेण्यात आली होती. स्पर्धेत भोकर येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या इयत्ता सातवीतील आयान मदारसाब शेख यांनी सादर केलेल्या अंधांसाठी स्मार्ट स्टिकलास प्रथम क्रमांक पटकावला आहे.जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या सुचनेनुसार प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ साहित्य तयार करण्याची स्पर्धा जिल्ह्यातील सर्व शाळेत घेण्यात आली.त्यानंतर मागील डिसेंबर महिन्यात (ता.२०) जिल्हा स्तरावर स्पर्धा आयोजित केली होती त्याचा निकाल मंगळवारी ता. (दोन) जाहिर करण्यात आला. यावेळी येथील जिल्हा परिषद हायस्कूलचा विद्यार्थी आयान शेख यांनी तयार केलेल्या अंधांच्या काठिला प्रथम क्रमांक मिळाला आहे.हि काठी अंधाना रस्त्यावरून चालताना समोरील धोक्याची सुचना देते. काठी तयार करण्यासाठी प्लास्टिक पाईप, निकामी अटोरिक्षातील बझर आणि ईतर साहित्याचा वापर केला आहे. मूख्याद्यापक प्रकाश खोकले, विज्ञान विषयाचे शिक्षक संजय खांडरे यांच्या मार्गदर्शना खाली स्टिक काठी तयार केली आहे. त्याच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.

# प्रा. प्रज्ञा पंडित यांचा 'सावित्रीच्या लेकी'ने गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चा तर्फे नुकत्याच आयोजित करण्यात कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांना 'सावित्रीच्या लेकी' हा सन्मान देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमात ठाणे शहरातील नामवंत लेखिका, कवयित्री, समीक्षक, निवेदक आणि प्रवचनकार प्रा. प्रज्ञा पंडित यांचाही माननीय आमदार श्री संजयजी केळकर आणि माजी नगरसेविका सौ दीपा गावंड यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

लहानपणापासूनच मला सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल नितांत आदर आहे. भाजपा ओबीसी मोर्चा तर्फे देण्यात आलेला 'सावित्रीच्या लेकी' हा सन्मान हा सावित्रीबाईंचा आशीर्वाद म्हणून स्वीकारताना आज मला मनस्वी आनंद होत आहे," अशा शब्दात मत प्रा. पंडित यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

प्रा. पंडित यांची आजवर विविध विषयांवरची अठरा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच हिंदू धर्मातील स्तोत्र मंत्रांचा ठेवा जपण्यासाठी ' प्रज्ञा स्तोत्र अध्ययन वर्ग ' ह्या उपक्रमांतर्गत हिंदू धर्मातील विष्णू सहस्त्रनाम, देवी सूक्त यासारखी अनेक स्तोत्रे जगभरातील भक्तांना शिकवत आहेत. विष्णू सहस्त्रनाम या महास्तोत्रावर त्या प्रवचनही करतात. या शिवाय अन्नदान, वृद्धाश्रमाला मदत यासारख्या अनेक सामाजिक उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

# शेतीचा वाद; पोलिसांत गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**माळीवाडा :** येथून जवळच असलेल्या माळीवाडा येथील बाळु कान्होजी बनसोडे वय 33 वर्षे धंदा शेती व दुध व्यवसाय रा. गट क्रं. 191 माळीवाडा ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांनी दौलताबाद पोलीस स्टेशन ला येवुन तक्रार दिली की,आम्ही आईवडील,दोन मुलासह माळीवाडा येथे राहतो व त्यांची गट क्रं 191 माळीवाडा येथे शेती असून त्यांचा शेतीवर उदरनिर्वाह चालतो शेती ही वडील कान्होजी सोनाजी बनसोडे यांचे नावे आहे. त्याच ठिकाणी बाळू बनसोडे यांचे स्वतःचे राहते घर असुन ते कुंटुबीया सह तेथेच राहतात.

सन 2014 मध्ये शहरातील डीलक्स बेकरीचे मालक अशफाक खान हमीद खान रा.आरेफ कॉलनी हीमायतनगर रोड छत्रपती संभाजीनगर यांनी बनसोडे यांच्या वडीलास दारु पाजुन दारुच्या नशेत त्यांची जमीन गट क्रं. 191 मधील एक हेक्टर जमीनीची दि.31/09/2014 रोजी त्यांच्या नातेवांइकाना साक्षीदार दाखवुनजमिनीची इसार पावती व मुक्त्यार पत्र करुन घेतली असा आरोप बनसोडे यांनी केला म्हणून दिनांक 28/11/2023 रोजी दुपारी 02.00 वा.बनसोडे कुंटुबीय घरी असतांना अशपाक खान हमीद खान व त्यांच्या सोबत त्यांचा मुलगा उमर खान अशफाक खान, सुनिल पुंजाधर दिवेकर रा. माळीवाडा, मोफीक खान उर्फ गुड्डु मुखबल खान, प्रभु नारायण बागुल दोघे रा. आसेगाव व त्यांचे सोबत अनोळखी अंदाजे दोनशे ज्यात काही महीला व काही पुरुष असे गट क्रं. 191 मधील शेतात आले. व त्यातील अशफाख खान व त्यासोबत उमर खान अशफाक खान, सुनिल पुंजाधर दिवेकर रा. माळीवाडा, मोफीक खान उर्फ गुड्डु मुखबल खान, प्रभु नारायण बागुल यांनी घरात घुसून त्यांनी घरातील महीलांची वाईट उद्देशाने छेडछाड करुन त्यांच्या सोबत लज्जास्पद वर्तन केले. त्यातील अशफाक खान म्हणाला महाराज तु खुप माजलास, धनगरा तुझी मस्ती जिरवुन टाकतो तुला कोण हिंदु येवुन वाचवतो ते मी पाहतो. अशी धमकी दिली आणि कुंटुबीयांना शिवीगाळ करुन लाथाबुक्याने मारहाण केली. त्यानंतर त्यांनी बनसोडे कुटुंबियांना घरातच कोंडुन बाहेरुन कडी लावुन गेले व घराबाहेर निघु नये म्हणुन काही लोक दरवाज्या बाहेरच ठेवले होते. व आलेल्या लोंकानी सदर शेतात तार कंपाउड करुन अतिक्रमण केले होते.या प्रकरणात मा. न्यायालयाने बनसोडे यांच्या बाजुने स्टे ऑर्डर दिल्याने नंतर काही दिवसांनी अशफाक खान यांनी रात्रीच्या सुमारास तार कंपाउड काढून घेतले. तसेच शेतात कामावर असलेल्या कामगारांही तुम्ही येथे काम करु नका तुम्ही येथुन निघुन जा, आमच्या नादाला लागाल तर तुम्हाला जिवे मारुन टाकु असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली आहे. त्यातील उमर खान हा नेहमी पाळत ठेऊन असुन तो मला वारंवार जिवे मारण्याची धमकी देत आहे. तसेच दि. 01/06/2023 रोजी अशफाक खान व त्यांच्या सोबतच्या काही लोंकानी आमच्या शेतात येवुन आम्हाला जिवे मारण्याची दिली. त्यामुळे दि. 01/06/2023 रोजी पोस्टे दौलताबद येथे अशफाक खान व इतरां विरुध्द तक्रार दिली. मारहाण झाल्यावर घरघुती उपाय केलेला आहे. त्यांच्या अशा प्रकारामुळे बनसोडे कुटुंबीय तनावाखाली असून त्यामुळे अशपाक खान हमीद खान रा. आरेफ कॉलनी हीमायतनगर रोड छत्रपती संभाजीनगर हे व त्यांच्या सोबत त्यांचा मुलगा उमर खान अशफाक खान, सुनिल पुंजाधर दिवेकर रा. माळीवाडा, मोफीक खान उर्फ गुड्डू मुखबल खान, प्रभु नारायण बागुल दोघे रा. आसेगाव व त्याच्या सोबत अंदाजे दोनशे अनोळखी महीला व पुरुष याचे विरुध्द भा.दंड सहिंता कलम ४५२,३५४,१४३,४४७,४४२,३२३,५०४,५०६ नुसार तक्रार देण्यात आली आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# ‘बळीराजा समृद्धी मार्ग शेतपाणंद रस्ते 'अभियानाचा शुभारंभ

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात 5001 किलोमीटर शेतपाणंद रस्ते

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** गावागावातील पाणंद रस्ते हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा विषय आहे. जिल्ह्यातील शेतकरी समृध्द करायचा असेल तर शेतीची अवजारे, बी-बियाणे व इतर कृषी निविष्ठा ने-आण करण्यासाठी पाणंद रस्त्यांची नितांत आवश्यकता आहे. शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी या रस्त्यांचे विशेष महत्त्व आहे. याचीच जाणीव ठेवून राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्ह्यात 5001 किलोमीटरचे पाणंद रस्ते करण्याची मोहीम हाती घेतली आहे. यादृष्टीने पहिले पाऊल टाकत पालकमंत्री श्री. मुनगंटीवार आणि राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत जिल्हा कृषी महोत्सवात ‘बळीराजा समृद्धी मार्ग शेतपाणंद रस्ते’ अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. चालू आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यात 5001 कि.मी.चे शेतपाणंद रस्ते तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये मातीकाम पूर्ण झालेले 2055 कि.मी. चे रस्ते, मातीकाम सुरू असलेले 405 कि.मी. चे रस्ते आणि नव्याने प्रस्तावित 3182 कि.मी.चे मुरमीकरणाचे शेतपाणंद रस्ते आणि मुरमीकरण झालेले परंतु खडीकरण बाकी असलेले इतर रस्ते सुरू करण्यात येतील. यामुळे जिल्ह्यात सर्वत्र शेतकऱ्यांना त्यांना शेतावर जाण्या-येण्यासाठी बारमाही सुसज्ज असे रस्ते उपलब्ध होणार आहे. यातून शेतकऱ्यांना शेतातील माल बाजारपेठेत पोहचविणे सहज शक्य होणार आहे. पाणंद रस्त्याची सुविधा निर्माण झाल्यावर जिल्ह्यातील शेतकरी, बाजारात मागणी असलेले उत्पादन आपल्या शेतात पिकविण्याचा प्रयत्न करणार असून यातून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक समृध्दी निर्माण होण्यास मदत होईल. बळीराजा समृद्धी मार्ग शेत पाणंद रस्ते अभियानाची प्राधान्याने अंमलबजावणी करून पावसाळ्यापूर्वी शेताकडे जाणारे रस्ते तयार करावे, असे आवाहन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.



बळीराजा समृद्धी मार्ग शेतपाणंद रस्ते अभियानात रस्त्यांच्या स्थितीनुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. यात मातीकाम पूर्ण झालेले रस्ते, मातीकाम सुरू असलेले रस्ते, नवीन प्रस्तावित रस्ते आणि मुरुमकाम पूर्ण झालेले खडीकरणाकरीता प्रस्तावित रस्त्यांचा समावेश आहे. सदर कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे नियोजन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आले आहे.

**तालुकानिहाय शेतपाणंद रस्यांची कामे व त्याची लांबी :** जिवती 348 कामे (696 .10 कि .मी .), 603 कामे (603 कि .मी .), चिमुर 397 कामे (502 कि .मी .), सिंदेवाही 381 (401 .25 कि .मी .), ब्रम्हपूरी 394 (382 .80 कि .मी .), नागभीड 379 (379 कि .मी .), मूल 266 (357 कि .मी .), सावली 290 (311 कि .मी .), गोंडपिपरी 168 (281 .30 कि .मी .), चंद्रपूर 157 (261 .30 कि .मी .), पोंभुर्णा 292 (247 .65 कि .मी .), वरोरा 183 (201 .20 कि .मी .), बल्लारपूर 142 (163 कि .मी .), भद्रावती 146 (148 कि .मी .) आणि कोरपना तालुक्यात 50 कामे (66 .90 कि .मी .) असे एकूण 4196 कामांची संख्या असून या पाणंद रस्यो ची एकूण लांबी 5001 .80 कि .मी . आहे

# वैजीनाथ वाचनालयात पुस्तक प्रदर्शन करून सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील नगरपालिकेच्या वैजीनाथ व वाचनालयात बुधवारी शिक्षणाच्या अग्रदूत सावित्रीबाई फुले यांच्या१९३व्या जयंती निमित्त पुस्तक प्रदर्शन आयोजित करून त्यांच्या प्रतिमेला मुख्याधिकारी तथा प्रशासक भागवत बिघोत (राजपूत) यांनी व जेष्ठ नागरिक बबनराव क्षीरसागर, इकबालसिंह पंजाबी यानी पुष्पहार अर्पण करून प्रथम अभिवादन केले. सहायक मुख्याधिकारी राहुल साठे, भांडरपाल वाल्मिक शेटे, माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, तालुका कलाकार संघचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड, नगरसेवक राजेश गायकवाड, पर्यवेक्षक एम. आर. गणवीर, स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे, रमेश त्रिभुवन, ग्रंथपाल सहायक गुलाबराव गायकवाड, संजय राजपूत, साहेबराव पडवळ, दिलीप अनर्थे, अण्णासाहेब ठेंगडे, शाहीर अशोक बागुल, सेवा निवृत्त पोलीस अधिकारी सोपानराव निकम, प्रवीण देशपांडे, जगन गायकवाड,व नगर पालिकेचा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, सूत्र संचलन धोंडीराम राजपूत यांनी केले. एम. आर. गणवीर यांनी आभार मानले.



# बोगस डॉक्टरविरुद्ध धुळे पोलिसांची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पोलीस अधीक्षक मा. श्रीकांत धिवरे यांना काही दिवसा अगोदर परवाना नसतांना वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या ॲलोपॅथी औषध साठा बाळगून , रूग्णावर उपचार करून रूग्णांच्या जिवाशी खेळणाऱ्या बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्या बाबत तक्रार प्राप्त झाली होती त्याच अनुषंगाने जिल्ह्याच्या विविध ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक मा. श्रीकांत धिवरे यांनी पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार दि. ०४ जानेवारी रोजी धुळे जिल्ह्यात वेगवेगळ्या गावांना छापा टाकून तपासणी केली असता त्यात वैद्यकीय परवाना नसतांना ॲलीओपॅथी औषध साठा व साहित्य ( त्यात इंजेक्शन, सलईन, व गोळ्या ) बाळगून उपचार करणाऱ्या ७ बोगस डॉक्टरांवर महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ च्या कलमान्वये गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात आली आहे. कारवाही पिंपळनेर सोनगीर, शिरपूर, शिरपूर तालुका अशा ठिकाणी करण्यात आले आहे. त्यात बोगस डॉक्टर तपासून विश्वास, संभाजी माधवराव सोनवणे, योगेश चंद्रकांत पाटील, राकेश प्रकाश पाटील, विजयसिंह धुडकू बडगुजर, समर विजय विश्वास,धीरज रोहिदास अहिरे, असे बोगस डॉक्टर आले आहेत. पोलीस अधीक्षक यांच्या तर्फे आवाहन करण्यात येते कि बोगस डॉक्टर बाबत पोलीस विभागाकडे माहिती देण्यात यावी माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल.

# अवकाळीनंतर शेतीमालाला भावाचा फटका, शेतकरी चिंताग्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** नोव्हेंबर- २०२३मधे झालेल्या आवकाळी पावसामुळे शेती मालाला फटका बसला असून आस्मानी नंतर सुलतानी फटका बसल्याने दुहेरी संकट शेतकऱ्यांवर आले आहे. अवकाळीच्या अगोदर कापसाला सात हजार रुपयांच्या वर भाव प्रति क्विंटल मिळत होते तर मकाला ही २१००-२२०० दर मिळत होते.परंतु नोव्हेंबर च्या अवकाळी नंतर कापसाचे ओला पाच ते सहा हजार तर कोरडा सहा ते सहा हजार आठशे दर प्रति क्विंटल प्रमाणे व्यापाऱ्यांकडून खरेदी सुरू आहे.मका १८००ते २१०० चे दर मकाला मिळत आहे. तर अद्रक तुर या शेतीमालाचे दर ही खाली आले आहे. एकुण आस्मानी नंतर सुलतानीचे संकट शेतकऱ्यांवर आहे. वर्ष २०२३ चा पावसाळा नाममात्र झाल्याने महागडी बी बियाणे



खते औषधी मजुरी खर्च मरमर मेहनत वाया गेली त्यात इकूनतिकून शिल्लक शेतीमाल हाती येईल असी आशा शेतकऱ्यांना होती तेही अवकाळीने माती मोल केली त्यात जेमतेम पिके हाती असतांना तेही भाव खाली पडून असल्याने शेतकरी पुरता नागवला गेला आहे पुर्वी निसर्गापुढे व आता व्यापाऱ्यापुढे शेतकऱ्यांना कुणी वाली आहे की नाही असा समज त्याला झाला आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर